रमजान मुबारक
आज का इफ्तार ६.३७
कल की सहेर ५.२०

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ९५ वा फोन २३०१०१ दिनांक ५ मार्च २०२६ गुरुवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# विदेशात अडकल्यावर गळा काढून भोकाड पसरता परदेशातून शिकून आल्यानंतर देशासाठी काय करता ?

बीड दि.४ (प्रतिनिधी):- सध्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये दुबई, कुवैत व अन्य आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांना वापस आणण्यासाठी सरकारकडून युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. एरव्ही आपल्या देशाला नाव ठेवायचे, दुसऱ्या टीचभर देशाचे गुणगाण गायचे, तिकडून शिकून यायचं आणि इकडं पैसे कमवायचे आणि असा एखादा प्रसंग आला, संकट आली की आम्हाला वाचवा, देशाची जबाबदारी, प्रसारमाध्यमांवर व्हिडीओ, सरकार काहीच करत नाही अशी बोंब सुरु होते. खरचंच जे लोक शिक्षण, नोकरीसाठी विदेशात जातात त्यांना एरव्ही देशाविषयी किती जणांना आस्था असते. बाहेरच्या देशात राहणं म्हणजे एक स्टेटस् सिम्बॉल समजतात. मुलगा कुठे आहे दुबईला, कतारला हे मोठ्या फुशारकीने सांगितले जाते. तिथून भारतात आल्यानंतर ते या देशासाठी काय करतात ? भारतासारखा सुरक्षीत, सहिष्णू, शांतीप्रिय देश जगाच्या पाठिवर सापडणार नाही. पैशाच्या जोरावर मोठे झालेले आखातातील तेल सम्राट असलेले देश आज युद्धजन्य परिस्थितीत परेशान झाले आहेत. संरक्षण यंत्रणाच त्यांच्याकडे नाही, भारत आज स्वबळावर संरक्षणसिद्ध झालेला आहे. सर्व सीमा सुरक्षीत आहेत, कोणत्याही पातळीवर युद्ध करायला आपण सदैव सज्ञ आहोत.



## तेलाच्या पैशावर अतिश्रीमंत असलेले देश सुरक्षेत मात्र कुचकामी

आखाती देशामध्ये तेलाच्या विहीरी हे त्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. हे देश तेलाच्या जीवावर मोठे झाले, प्रचंड पैसा कमविला, तेलाच्या व्यवसायात त्यांची मक्तेदारी आहे. मोठमोठ्या इमारती, झकपक अशा प्रकारचे पर्यटनस्थळे झाली, परंतु या देशांनी कधी स्वतःची सुसज्ज, शक्तिशाली, अत्याधुनिक यंत्रणाच उभी करण्याचा विचार केला नाही. आज इराणकडून हल्ले होत असतांना दुबईमधल्या अत्यंत गगनचुंबी आणि देखण्या इमारती पत्त्यासारख्या कोसळत आहेत. भारताने स्वातंत्र्यप्राप्तीपासून सतत देशाची सुरक्षितता आणि सार्वभौमतेला प्राधान्य दिले. आज आपण किती सुरक्षीत आहोत याचा अनुभव घेत आहोत. पान २ वर

## 'उमरा'साठी गेलेल्यांना आणणे गरजेचे

रमजानच्या काळात दरवर्षी भारतातून लाखो मुस्लिम बांधव 'उमरा' या धार्मिक विधीसाठी सौदी अरेबियात जात असतात. सध्या देखील मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधव 'उमरा'साठी गेलेले आहेत. १५ दिवस, १ महिन्याचा धार्मिक विधी करुन ते परत येतात, मात्र पान २ वर

सध्या प्रसारमाध्यमांवर भारतातील असणारे परंतु विदेशात अडकलेल्या भारतीयांच्या संदर्भातील व्हिडीओ आणि बातम्या पहायला मिळत आहेत. इतके भारतीय अडकले, इतके विद्यार्थी अडकले त्यांना सोडविण्यासाठी सरकार काय करत आहे ? अशी बरीचशी चर्चा चालू असते. परंतु आता सरकारच्या नावाने गळा काढून रडणारे हे लोक एरव्ही सरकारला नावे ठेवतात, आपल्याच देशाला कमी लेखतात. तिकडे शिकून आल्यानंतर आपल्या देशातील नागरिकांसाठी ते काय करतात. अशा संकट काळात या अगोदरही आणि आताही भारत सरकारने विशेष विमाने पाठवून अडकलेल्या विद्यार्थ्यांना, नागरिकांना देशात परत आणले. मागच्या वेळेस युक्रेनमध्ये झालेल्या युद्धात त्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षीतरित्या वापस देशात आणण्यात आले आणि एरव्ही हेच लोक भारताला नाव ठेवतात. देशातील व्यवस्थेच्या नावाने ओरडतात, सरकारला शिव्या देतात. आपल्या देशाचा आपल्याला गर्व आणि स्वाभिमान असला पाहिजे. भारतातील लोकशाहीत आपलेच लोक आपल्या लोकांना नावे ठेवतात. खरं तर भारतासारखा शक्तिशाली, सामर्थ्यवान, सहिष्णू आणि मानवतावादी दृष्टीकोन ठेवणारा दुसरा देश पान २ वर

## ईद व गुढी पाडव्या निमीत्त फेब्रुवारीचे वेतन, फेस्टिव्हल लोन द्या

### न.प.कर्मचाऱ्यांची मागणी

बीड दि.४ (प्रतिनिधी):- येथील नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागासह सर्वच कर्मचाऱ्यांनी रमजान ईद व गुढी पाडव्याच्या अनुषंगाने फेब्रुवारीचे वेतन व फेस्टिव्हल लोन देण्यात यावे अशी मागणी नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि.१९ मार्च २०२६ रोजी गुढी पाडवा आणि २१ मार्च रोजी रमजान ईद आहे, त्या अनुषंगाने दोन्ही सणा निमीत्त माहे फेब्रुवारीचे पगार व फेस्टिव्हल लोनची व्यवस्था झाल्यास सर्व कर्मचाऱ्यांना सणाच्या अनुषंगाने मोठा हातभार लागेल, त्यामुळे लवकरात लवकर पगार व फेस्टिव्हल लोनची व्यवस्था करावी अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## जातेगाव येथील कॉपी प्रकरणाची चौकशी सुरु -शिक्षणाधिकारी

बीड दि.४ (प्रतिनिधी):- सध्या दहावीच्या परीक्षा सुरु असून दि.४ मार्च रोजी हिंदी विषयाचा पेपर पार पडला. दुपारच्या सुमारास माध्यमांमध्ये यमाई देवी माध्यमिक विद्यालय जातेगाव तसेच माध्यमिक विद्यालय सिरसदेवी येथील परीक्षा प्रक्रियेचे वृत्त प्रसारीत झाले. त्यामध्ये माध्यमिक विद्यालय सिरसदेवी येथे मुलांना पत्र्याच्या खोलीत पान २ वर

# कुंवर मॅडम, आता तरी केंद्र प्रमुख पदोन्नतीचा हट्ट सोडा

## शिक्षकांनीच दिला उपोषणाचा इशारा

बीड दि.४ (प्रतिनिधी):- सीटीईटी परिक्षेचा निकाल लागण्यापुर्वीच केंद्र प्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्याचा हट्ट प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी कुंवर मॅडम यांनी धरला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना, राज्यात कुठेच ही प्रक्रिया सुरु नसतांना केवळ काही लोकांना पदोन्नत्या देऊन त्यांना खुश करण्यासाठी सुरु असलेली ही प्रक्रिया थांबवा म्हणून आता पदवीधर शिक्षक महासंघाने सुद्धा रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. प्रक्रिया स्थगित न केल्यास ९ मार्चपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा शिक्षक महासंघाने दिला आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील निवेदन देण्यात आले आहे. दरम्यान कुंवर मॅडम, सर्व स्तरातून या प्रक्रियेला विरोध होत असतांनाही एकट्या अंडील व त्यांच्या सोबतच्या काही लोकांना पदोन्नती देण्याचा हट्ट सोडा, जे नियमानुसार आहे तेच करा, नियमबाह्य कामे केल्यास काय होतयं हे तुम्हालाही काही प्रकरणावरुन कळून चुकलेलं आहे.

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागाने केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. या प्रक्रियेला सर्व स्तरातून विरोध होऊ लागला आहे. हा विरोधही मुद्याला आणि न्यायालयीन प्रक्रियेला अनुसरुनच आहे. आता या प्रकरणात पदवीधर शिक्षक महासंघाने देखील आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी टीईटी पात्र असणाऱ्या शिक्षकांची तात्पुरती सेवाज्येष्ठता पान २ वर

## आक्षेप घेतले पण सुनावणी का टाळली ?

केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिये अंतर्गत शिक्षण विभागाने सलग सुट्टयाच्या कालावधीनंतर आक्षेप मागविले. या प्रकरणात अनेक शिक्षकांनी आक्षेप नोंदविले आहेत. सदरील आक्षेप शिक्षण विभागाने घेतले आहेत परंतु कसल्याही प्रकारची सुनावणी न घेता त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दिला आहे. आक्षेप घ्यायचे होते तर नियमानुसार त्यात सुनावणी देखील अपेक्षित होती परंतु शिक्षणाधिकाऱ्यांनी सुनावणी का टाळली ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. एवढा आटापिटा करुन ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा घाट शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घातल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

आखाती युद्धाचा फटका

## कांदा, द्राक्षे-बेदाणा व्यापारावर परिणाम

### सुरेश धस यांची सभागृहात आक्रमक मागणी

आष्टी दि.४ (प्रतिनिधी):- सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळ यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी निर्यातीवर होत असलेल्या गंभीर परिणामांचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला. कांदा, द्राक्षे आणि बेदाणा या प्रमुख पिकांच्या निर्यात व्यापारावर मोठा



परिणाम होत असून शेतकरी व व्यापाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. धस यांनी सांगितले की, आखाती देश हे महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांचे प्रमुख निर्यात बाजारपेठ असून सध्याच्या पान २ वर

## बीड जिल्ह्यातील २२ बालवैज्ञानिकांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

बीड दि.४ (प्रतिनिधी):- जिल्हा प्रतिनिधी केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून कडून आयोजित करण्यात येणाऱ्या इन्स्पायर अवार्ड मानक या महत्वकांक्षी योजनेमध्ये यावर्षी बीड जिल्ह्यातील २२ बाल वैज्ञानिकांची इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड झाली आहे, २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग भारत सरकार यांचे कडून हा निकाल जाहीर करण्यात आला आहे, ही योजना सहावी ते बारावी या शालेय व्धियार्थ्यांसाठी असून कोणत्याही बोर्डाचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे प्रमाणपत्र पान २ वर

जाधवर आत्महत्या प्रकरण ; एलसीबीने केली अटक

# प्रदीप फाटेचा मुक्काम आता पोलीस कोठडीत

बीड दि.४ (प्रतिनिधी):- संपूर्ण जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागाचे अधिकारी सचिन नारायण जाधवर यांच्या आत्महत्या प्रकरणात बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि वरिष्ठ अधिकारी प्रदीप फाटे याला पुणे येथील लोणीकँद परिसरातून मंगळवारी अटक करण्यात आली आहे. गेल्या ४० दिवसांपासून फाटे फरार होता. बुधवारी फाटे यास न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने प्रदीप फाटे यास तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पान २ वर




## नाळवंडी येथे धुरवडीच्या दिवशी दलित समाजाच्या तरुणांवर चाकू हल्ला

### ३ गंभीर जखमी ; गुन्हा अद्याप दाखल नाही

बीड दि.४ (प्रतिनिधी):- रंगांचा, आनंदाचा व उत्साहाचा सण असलेल्या होळीच्या दिवशी नाळवंडी गावात रक्तरंजित घटना घडल्याने सणावर विरजण पडले. धुरवडीच्या दिवशी (३ मार्च) गावातीलच पाच ते सहा जणांनी जातिवाचक शिवीगाळ करत, एका दलित समाजाच्या तरुणावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या मारहाणीत तिघे तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यात जखमी झालेल्यांमध्ये आकाश अशोक कानडे (वय २४, रा. धनगरवस्ती, नाळवंडी), अभिषेक श्रीमंत म्हेत्रे पान २ वर



## मदनबाई लोढा यांचे संथारा व्रतामध्ये निधन

### प्रेमचंद, दिलीप, अशोक लोढा यांना मातृशोक

बीड दि. ४ (प्रतिनिधी):- माजी आमदार स्व.चांदमल लोढा यांच्या धर्मपत्नी श्रीमती मदनबाई चांदमल लोढा (वय ८९) यांना मंगळवार दि.३ मार्च रोजी रात्री ८.३० वाजेदरम्यान संथारा व्रतामध्ये वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या पार्थिवावर ४ मार्च बुधवारी मोंढा रोडवरील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



सकाळी १०:३० वाजता त्यांची डोली जालना रोडवरील गणेश हाउसिंग सोसायटीमधील अशोक लोढा यांच्या निवासस्थानापासून निघाली. पान २ वर

# नवगण राजुरीत मुलीची गळफास घेऊन आत्महत्या

नवगण राजुरी दि.०४(प्रतिनिधी):- येथील इयत्ता अकरावीत शिकणाऱ्या मुलीने अज्ञात कारणाने राहत्या घरातील सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली.कु. शुभांगी गणेश गावडे वय १७ वर्ष राहणार नवगण राजुरी या इयत्ता अकरावी वर्गात शिकणाऱ्या मुलीने घरातील सिलिंग फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवार दि.०४ रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्यापूर्वी घडली या घटनेची माहिती बीड ग्रामीण पोलिसांनी कळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा व प्रेताचा पंचनामा केला.

## तारापूर औद्योगिक वसाहतीत वायू गळती

बोईसर दि.४ (वृत्तसेवा):- पालघर जिल्ह्यातील बोईसरमधील तारापूर औद्योगिक वसाहतीतल्या भगेरिया केमिकल्समध्ये (जुने नाव : झेनित केमिकल्स) ओलियम वायूची गळती झाली. परिसरात असलेल्या अनेक नागरिकांना तसेच कामगारांना या वायू गळतीचा त्रास झाला. ओलियम वायू हवेच्या संपर्कात आल्याने सल्फर डाय ऑक्साईड आणि इतर सल्फरस ऑक्साईडची निर्मिती झाली. यामुळे अनेकांना डोळे चुरचुरणे, डोळे लाल होणे, घशाला कोरड पडणे, घसा खवखवणे अशा स्वरूपाचा त्रास जाणवू लागला.

पान १ वरून

## तेलाच्या पैशावर अतिश्रीमंत असलेले देश...

आखाती देशांमध्ये ड्रोन आणि मिसाईलने हल्ले होत असतांना त्यांना नेस्तनाबूत करणारी एअर डिफेन्स सिस्टिम त्यांच्याकडे नाही, प्रतिहल्ला करण्याची सामुग्री नाही. पैसाच सर्व काही नसतो, देश हा सुरक्षित करायचा असेल तर अगोदर देशाच्या सीमा सुरक्षीत कराव्या लागतात. अत्याधुनिक यंत्रणा निर्माण करावी लागते हे यातून समोर आले आहे.

## 'उमरा'साठी गेलेल्यांना आणणे....

**सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत ते देखील त्या ठिकाणी अडकले आहेत. अशा 'उमरा'साठी गेलेल्यांना भारतात आणण्याची गरज आहे आणि सरकारचे त्या दृष्टीने प्रयत्न देखील सुरु आहेत.**

## विदेशात अडकल्यावर गळा काढून...

सापडणार नाही. संकट काळात पहिल्यांदा मदत, नंतर बाकी या भावनेने जो तो पुढे जात असतो. आज इराण आणि अमेरिका युद्ध चालू आहे, या युद्धात आखाती देशांमध्ये अडकलेल्या लोकांना आणण्यासाठी सरकारने पूर्ण यंत्रणा ताकदीनिशी लावली आहे. वेगवेगळे हेल्पलाईन नंबर दिलेले आहेत. विशेष विमाने पाठवून दुबईला पर्यटनासाठी गेलेल्या लोकांना आणले जात आहे. या ठिकाणी नोकरी, शिक्षण घेणाऱ्यांना आणण्यासाठीचेही प्रयत्न चालू आहेत. परंतु संकट आले की देश आठवतो. संकट आले की देशाने काय करायला पाहिजे याचे सल्ले दिले जातात, परंतु एरव्ही देशासाठी आपण काय करतो? याचाही विचार केला गेला पाहिजे.

## मदनबाई लोढा यांचे संथारा व्रताने निधन

दिवंगत मदनबाई लोढा यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी (पुष्पा संदीप भंडारी, पुणे), सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबुशेठ) लोढा, स्व. सतीश लोढा, दिलीपचंद लोढा, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या त्या मातोश्री होत.

## कुंवर मॅडम, आता तरी केंद्रप्रमुख पदोन्नतीचा

यादी प्रसिद्ध केली आहे. मात्र त्यात प्रशिक्षीत पदवीधर सेवाज्येष्ठ शिक्षकांचा समावेश नाही. शासन स्तरावरुन ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सीटीईटी परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या प्रमाणात सेवाज्येष्ठ प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी शासनाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकामुळे व टीईटी परिक्षेमुळे वंचित असलेल्या शिक्षकांनी सीटीईटी परीक्षा दिलेली आहे. सदर परिक्षेचा निकाल अद्याप जाहिर झालेला नाही, केवळ टीईटी परिक्षेच्या निकालाच्या आधारे सेवाज्येष्ठता डावलून केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे सीटीईटी परिक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या अनेक सेवाज्येष्ठ प्राथमिक पदवीधर शिक्षकांवर अन्याय होणार आहे. सीटीईटी परिक्षेचा निकाल लागेपर्यंत पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात येऊ नये अशी मागणी पदवीधर शिक्षक महासंघाने केली आहे. या प्रकरणात अनेक शिक्षक संघटनांनी ४० ते ५० रिव्ह्यूव्ह पिटीशन दाखल केलेले आहेत त्यामुळे या पिटीशनचा अंतीम निर्णय होईपर्यंत ही प्रक्रिया स्थगित करावी. सेवाज्येष्ठतेच्या प्रसिध्द केलेल्या यादीत २०१४ मध्ये वस्तीशाळा शिक्षकांना डायरेक्ट पद्धतीने प्राथमिक पदवीधर पदावर नियुक्त्या दिलेल्या शिक्षकांची नावे दिलेली आहेत. जे की ते कोणत्याही सेवाज्येष्ठतेत बसत नाहीत, त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करावी. २०१४ ची १०७२ प्राथमिक पदवीधर दर्जावाढ प्रक्रिया नियमाप्रमाणे पुनश्च: फेर करुन केंद्रप्रमुख पदोन्नती राबविण्यात यावी. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये अनेक त्रुटी, चुका आहेत त्यामुळे ती रद्द करावी. अनेक शिक्षकांनी आक्षेप नोंदविले आहेत, त्याची पूर्ण शहानिशा झाल्याशिवाय आणि सदर यादीवर सुनावणी घेतल्याशिवाय ही प्रक्रिया राबविण्यात येऊ नये अन्यथा ९ मार्च पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा पदवीधर शिक्षक महासंघाने निवेदनातून दिला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष प्रवीण सानप यांच्यासह सर्व पदाधिकारी, शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## प्रदीप फाटेचा मुक्काम आता कोठडीत

याबाबत माहिती अशी की, १६ जानेवारी २०२६ रोजी सचिन जाधवर कामावर जातो असे सांगून घरातून बाहेर पडले होते, मात्र ते परतले नाहीत. १७जानेवारी रोजी मांजरसुंबा घाटातील कपिलधारवाडी फाट्याजवळ त्यांच्याच कारमध्ये त्यांचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. यानंतर २३ जानेवारी रोजी प्रदीप फाटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र या प्रकरणातील आरोपी प्रदीप फाटे तब्बल ४० दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होते. सदर आरोपीच्या अटकेसाठी मयत जाधवर यांच्या पत्नी आणि कुटुंबीयांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन देखील केले होते. पोलीस अधिक्षक नवनित कॉंवत यांनी पो.नि.शिवाजी बंटेवाड यांना आरोपीच्या शोधासाठी आदेश दिले होते. यावरुन पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांचे एक पथक तयार केले होते. सदर आरोपीचा शोध स्था.गु.शा पथकाने सुरु केला. तांत्रीक विश्लेशन व गोपनिय माहीतेचे आधारे सदर आरोपी हा पुणे लोणीकँद येथील त्याचे नातेवाईक यांचे घरी राहत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुणे येथे रवाना झाले व आरोपी प्रदिप फाटे यास पुणे लोणीकँद येथुन ताब्यात घेतले. त्यास पुढील कारवाईसाठी बीड ग्रामीण पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. शिवाजी बंटेवाड, सपोनि दराडे, पोउपनि. महेश विघ्ने, पोहवा. अशोक दुबाले, चालक पोहवा. मराडे, यांनी केली आहे. दरम्यान प्रदीप फाटे यास बुधवारी दुपारी बीड येथील न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यास तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता पुढील तीन दिवस फाटेचा मुक्काम कोठडीत असणार आहे.

## कांदे, द्राक्ष, बेदाणा व्यापारावर परिणाम

परिस्थितीमुळे मालाची निर्यात रखडली आहे. परिणामी बाजारभाव घसरत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.
सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने तत्काळ बैठक घेणे शक्य नसले तरी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी तातडीने बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. यावर संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले.
दरम्यान, चीनमार्गे अफगाणिस्तान येथून मोठ्या प्रमाणावर बोगस बेदाणा राज्यात दाखल होत असल्याचा गंभीर मुद्दाही धस यांनी उपस्थित केला. पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख बाजार समिती तसेच तासगाव परिसरात अशा प्रकारचा माल आल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणातील जबाबदारांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.
या प्रश्नांमुळे राज्यातील कृषी व व्यापार क्षेत्रातील चिंता वाढली असून सरकारच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी व व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## नाळवंडी येथे दलित समाजाच्या तरुणांवर चाकू हल्ला

(वय २४, रा.म्हेत्रे वस्ती, नाळवंडी) आणि विशाल भीमराव म्हेत्रे (वय २२, रा.म्हेत्रे वस्ती, नाळवंडी) यांचा समावेश आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वादातून सुरू झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर मारहाणीत झाले. एका तरुणाच्या हातावर चाकूने वार करण्यात आला. जातिवाचक शिवीगाळ झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सणाच्या दिवशी घडलेल्या या प्रकारामुळे गावात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. घटनेनंतर जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, एवढी गंभीर घटना घडूनही अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## जातेगाव येथील कॉपी प्रकरणाची चौकशी

परीक्षेसाठी बसविण्यात आल्याचे सांगण्यात आले. वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्र संचालकांकडून त्वरीत शाळेचे फोटो व खुलासा मागविण्यात आला, त्यातील शाळेचे फोटो व खुलासा अवलोकन केल्यानंतर त्या वृत्तात कोणतेही तथ्य नसल्याचे निदर्शनास आले, तसेच पत्र्याचेही फुटेजही त्या शाळेचे नसल्याचे केंद्र संचालकांनी नमूद केले आहे. यमाई देवी माध्यमिक विद्यालय जातेगाव येथे विद्यार्थ्यांमार्फत कॉपी पुरविल्या गेल्याचेही वृत्त समोर आल्याने या प्रकरणाची चौकशी सुरु असल्याचे माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी म्हटले आहे.

## बीड जिल्ह्यातील २२ बालवैज्ञानिकांची निवड

आणि दहा हजार रुपये इन्स्पायर अवॉर्ड स्वरूपात देण्यात येते, सदरील रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होते या रकमेमधून प्रोटोटाइप तयार करणे, त्याचे जिल्हास्तर आणि राज्यस्तरावर सादरीकरण करणे, विज्ञान शिक्षक आणि विद्यार्थी, यांचा प्रवास खर्च करणे अपेक्षित असते, समाज समाजोपयोगी, नाविन्यपूर्ण नवसंकल्पनांना यामध्ये प्राधान्य देण्यात येते, राष्ट्रीय स्तरावर सुपर साठ व्धिार्थ्यांना नॅशनल इन्स्पायर देण्यात येते, या विद्यार्थ्यांना टोकियो जपानला जाण्याची संधी मिळते, तसेच जपान सरकारतर्फे अकरावी बारावीला विशेष शिष्यवृत्ती देण्यात येते, यामध्ये ओंकार शिंदे बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांने सुपर सिक्सटी पोझिशन पटकावली आहे, तो येत्या ऑक्टोंबर मध्ये टोकियो जपान साठी रवाना होणार आहे, यावर्षी पूर्ण महाराष्ट्रातून २३०३ व्धिार्थ्यांनी इन्स्पायर अवॉर्ड पटकवले आहे .बीड जिल्ह्यातील इन्स्पायर अवार्ड मिळवणाऱ्या सर्व शाळा, विज्ञान शिक्षक आणि बाल वैज्ञानिकांचे विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड जितीन रहमान, इन्स्पायर अवार्ड च्या जिल्हा नोडल ऑफिसर तथा शिक्षणाधिकारी (मा) प्रिया राणी पाटील, किरण कुवर शिक्षणाधिकारी (प्रा.), मिलिंद तुरकमारे जिल्हा विज्ञान समन्वयक तथा विस्ताराधिकारी, भाऊसाहेब राणे जिल्हा समन्वयक इन्स्पायर अवार्ड मानक स्कीम आदींनी अभिनंदन केले आहे,


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने श्री.अशोक दामोधर गुळवेलकर यांचे मालकीची व ताब्यात असलेली बीड मोहल्ला जव्हेरी गल्ली येथील नगर परिषद हद्दीचे आतील घरजागा ज्यास शहर भुमापन क्र.१७२ असा मिळालेला आहे व बीड नगर परिषद मिळकत क्रमांक जुना २-१५-११३ व नवा २-१५-११७ असा मिळालेला आहे. नगर परिषद रेकॉर्ड प्रमाणे सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ ८६.६२ चौरस मीटर आहे, ज्यामध्ये २१.७५ चौ.मी. क्षेत्रफळाचे आर.सी.सी. बांधकाम, १५.५८ चौ.मी. क्षेत्रफळाचे धाबा बांधकाम व १५.५८ चौ.मी. क्षेत्रफळाचे पत्रे बांधकाम आहे. शहर भूमापन रेकॉर्ड प्रमाणे सदर जागेचे क्षेत्रफळ ४९.८० चौ.मी. आहे. सदर जागेची चतु:सिमा पुर्वेस - श्री.सुर्यकांत कुलथे व श्री.दयानंद पंडीत यांचे घर, पश्चिमेस - श्री.दिपक जोशी यांचे घर, दक्षिणेस - श्री.कोंडोपंत गुळवेलकर यांचे घर व उत्तरेस - सरकारी रस्ता येणेप्रमाणे वर्णन असलेली घरजागा माझे पक्षकाराने कायम खरेदी करण्याचा ठराव केला असुन विक्रेत्याने सदर घरजागा निर्विवाद असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर घरजागेमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे की इसार पावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आममुखत्यारपत्र इ.स्वरुपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदर घरजागा निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार सदर घरजागेचे कायदेशीर खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही.
सबब हे जाहीर प्रगटन

– जाहीर प्रगटन देणार –
ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट
कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड.
मो.नं.९४२२७४१०९१
12992

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार नामे १) डॉ.रविंद्र हिरालाल धुत, रा.विप्रनगर बीड २) श्री.शामसुंदर बालाप्रसाद जाजु, रा.ढेकणमोहा ता.जि.बीड यांनी श्री.कैलाससिंग गुलाबसिंग जनकवार, रा.ढेकणमोहा ता.जि.बीड यांचे मालकीचा व ताब्यात असलेला मौजे ढेकणमोहा ता.जि.बीड येथील सर्व्हे नंबर ७७ गट नंबर ४५७ मधील सहन प्लॉट ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर १०० फुट व रुंदी : पुर्व-पश्चिम ३५ फुट, एकूण क्षेत्रफळ ३५०० चौरस फुट असून चतु:सिमा पुर्वेस : श्री.कैलाससिंग गुलाबसिंग जनकवार यांची जमीन, पश्चिमेस : श्री.गुजर यांची प्लॉटींग, दक्षिणेस : बीड-परळी महामार्ग व उत्तरेस : श्री.कैलाससिंग गुलाबसिंग जनकवार यांची जमीन, येणेप्रमाणे वर्णन असलेला प्लॉट माझे पक्षकारांनी कायम खरेदी करण्याचा ठराव केला असून विक्रेत्याने सदरील प्लॉट निर्वीवाद असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर प्लॉटमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे की इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आममुखत्यारपत्र इ.स्वरुपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसाचे आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदरील प्लॉट निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार सदर प्लॉटचे कायदेशीर खरेदीखत करुन घेतील, त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही.
सबब हे जाहीर प्रगटन.

– जाहीर प्रगटन देणार –
ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट
कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड.
मो.नं.९४२२७४१०९१
12991


# डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वत:च्या वर्चस्वासाठी जगाला महायुद्धाच्या खाईत लोटले



दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ शनिवारला अचूक माहिती वेळ सकाळी ८.१० मिनिटे फक्त ६० सेकँदाचे थरारक ऑपरेशन खामेनेईच्या कँपाऊंडवर सुमारे ३० क्षेपणास्त्रे डागले व खामेनेईसह त्यांचे कुटुंबीय अन् ४० जण ठार झाले हा दिवस अमेरिका-इस्त्रायल कडुन इराणसाठी काळ ठरला.अमेरिकेची गुप्तहेर संघटना सीआयए व इस्त्रायलची गुप्तहेर संघटना मोसादने गेल्या सहा महिन्यांत सेटेलाईट डेटा आणि कम्युनिकेशन इंटरसेप्शन (फोन टॅपिंग) व्दारे खामेनेईच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले होते यामुळेच इराणचे सर्वोच्च नेते मारल्या गेले.डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करून मिडलीस्ट मधील संपूर्ण देशांना अग्नीच्या स्वाधीन केल्याचे दिसून येते.या युध्दाचे अमेरिकेला कमी प्रायश्चित्त भोगावे लागतील,परंतु याचे मानवी व वित्तीय प्रायश्चित्त मिडलिस्ट मधील देशांना मोठ्या प्रमाणात भोगावे लागत आहे.आज अमेरिकेने जगात महायुद्धाची परिस्थिती निर्माण केली आहे. कारण रक्तबंबाळ झालेला इराण शांत बसणारा देश नाही ही बाब सध्याच्या परिस्थितीवरून लक्षात येते.इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला खामेनेई व संपूर्ण टॉप कमांडर आणि लिडर मारल्याचा दावा अमेरिका व इस्त्रायलने केला आहे. यामुळे आजच्या परिस्थितीत इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे.त्यामुळे त्याने अमेरिकेच्या मिडलिस्टमधील ज्या-ज्या ठिकाणी सैन्य तळ आहे त्या संपूर्ण मिडलिस्ट देशांवर मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले, मिसाईल हल्ले व बॉम्ब वर्षाव सुरू केली आहे.त्यामुळे जगात महायुद्धाचे सावट दिसून येते आणि याचे जगात महाभयानक परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे.सध्याच्या युद्धजन्य परिस्थिती हा संपूर्ण प्रकार डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकडीमुळे व मुजोरीमुळे निर्माण झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प अयातुल्ला खामेनेई यांना मारून इराणमध्ये तक्ता पलट करून आपल्या पसंतीचे सरकार बनविण्याच्या तयारीत आहे.परंतु तसे लगेच होईल असे कोणतेही चिन्ह दिसत नाही. कारण अयातुल्ला खामेनेई व टॉप कमांडर मारल्या गेल्याने ईरान आगबबुला झालेला आहे. त्यामुळे तो केव्हाही कोणताही घातक निर्णय घेऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर आता जे युद्ध सुरू झाले आहे ते बदल्याच्या भावनेने सुरू झाले आहे. त्यामुळे आता जोही देश इराणच्या वाटेला जाईल किंवा विरूद्ध जाईल त्याला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहे आणि लागत आहे हेही तितकेच सत्य आहे.कारण इस्त्रायल-अमेरिकेने एकाच वेळेस बॉम्ब टाकून इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेईवर हल्ला करून त्यांना , त्यांच्या नातेवाईकांना व अनेक टॉप लिडरचा खात्मा केला.त्यामुळे आता इराणने इस्त्रायल-अमेरिका यांना इशारा दिला आहे की,आपण संपूर्ण मर्यादा ओलांडली आहे याची किँमत चुकवावी लागेल दोन्ही देशांना सोडणार नाही. यामुळे सध्यातरी युद्ध थांबण्याची चिन्हे दिसू येत नाहीत.कारण अमेरिका- इस्त्रायलने आतापर्यंत पेक्षा जास्त मिसाईलने बॉम्ब वर्षाव इराणवर केला आहेत आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने सुद्धा हजारो क्षेपणास्त्रे अमेरिकेच्या सैन्य तळावर डागले आहे.सरकारी आकडा सागतो की, शेकडोंच्या संख्येने जिवीत हानी झाली आहे.परंतु हा आकडा काहीही असला तरी हजारोंच्या संख्येने मोठ्या प्रमाणात इराण-इस्त्रायल-मिडलिस्ट मधील देश यांची जिवीत व वित्तीय हानी झाली आहे. ही बाब जगाच्या डोळ्यासमोर आहे.आज पश्चिम आशियाईमध्ये महायुद्धाची परिस्थिती निर्माण झाली आहे.आज खाडी देशांमध्ये अनेक युरोपीय नागरिक फसले असल्याने युरोपमध्ये सुद्धा चिंतेचे वातावरण आहे.कारण खाडी देशात ज्या -ज्या ठिकाणी अमेरिकन सैन्य तळ आहे त्या-त्या संपूर्ण ठिकाणी इराणने ताबडतोब हजारो मिसाईल हल्ले व द्रोण हल्ले सुरू करून पलटवार करने सुरू केले आहे. त्यामुळे इराणला नमविने तितकेसे सोपे दिसत नाही. आज या महाभयानक युध्दाचा परिणाम जगातील अनेक देशांना भोगावा लागत आहे.कारण ज्या-ज्या ठिकाणी अमेरिकन लष्करी तळ आहे अशा पश्चिम आशियात (मध्य पूर्व) अमेरिकेचे अनेक लष्करी तळ आहेत, ज्यात कतार, बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती(युएई), जॉर्डन, ओमान,इराक, दुबई आणि सीरिया या देशांचा समावेश होतो.या देशातील नागरिक भयभीत असुन मानवी व वित्तीय हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसत आहे.इरानकडुन सायबर अटॅक सुध्दा सुरू झाले आहे यामुळे अमेरिकेला अब्जो रूपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.आज या महायुद्धामुळे रेडीएशन पसरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.या युद्धामध्ये हजारो निरपराधांचा बळी जात आहे अशा परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघटना व जागतिक मानवाधिकार संघटना काय करीत आहे असाही प्रश्न उपस्थित होतो. अमेरिका- इस्त्रायल-इराण युध्दाने महायुद्धाचे उग्र रूप धारण केले आहे आणि संयुक्त राष्ट्र संघटना बघ्यांच्या भुमिकेत आहे ही अत्यंत लाजिरवाणी आणि चिंताजनक बाब आहे.जी संघटना मानव कल्याणासाठी जगावर लक्ष ठेवत असते तीच संघटना महायुद्धाच्या परिस्थितीत शांत का? असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी व मुजोरी अशीच सुरू राहिली तर संपूर्ण जग आगीत भस्मसात होऊ शकते.त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने आणि जागतिक देशांनी ताबडतोब युद्ध थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.जगात या अगोदर अनेक युद्ध झालीत यात अझरबैजान-अर्मेनिया, रशिया-युक्रेन, अफगाणिस्तान-तालिबान इत्यादी.परंतु सध्याचे अमेरिका-इस्त्रायल -इराण युद्ध आतापर्यंतच्या युद्धापेक्षा महाभयानक रूप धारण केले आहे.जगाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, अमेरिका दगाबाज देश आहे कारण अमेरिकेने अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पळ काढला होता, अमेरिकेनेच युक्रेनला रशियाच्या विरुद्ध भडकविले आणि युक्रेनला आगीत ढकलले अशाच प्रकारे अमेरिका इराणच्या युद्धाच्या नावावर मध्य पुर्व आशियाई देशांना रक्ताच्या लाथोळ्यात ढकलून निरपराधांचा बळी जात आहे व याला जबाबदार फक्त अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आहे आणि आज ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे जगाची दैन्यावस्था झाली असून सर्वांवर आर्थिक संकट ओढावले असून पश्चिम आशियातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून पोहोचली आहे.अमेरिकेला चार दिवसांत बिलियन डॉलरचे ( लाख करोड रुपये )नुकसान झाले आहे.जय हिंद.



रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार ) नागपूर

# शरद पवारच राज्यसभेचे उमदेवार सुप्रिया सुळेंकडून घोषणा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी):- राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अर्ज भरण्यास उद्या स्वतः शरद पवार येण्याची शक्यता कमी असून विधिमंडळातील अधिकारीच सिल्व्हर ओक निवासस्थानी जाणार असल्याची माहिती आहे. शरद पवार यांच्या नावाला अखेर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला असून काँग्रेसकडून ते जाहीर करण्यता आलं आहे. तर, संजय राऊत यांनीही ट्विट करुन महाविकास आघाडी एक राहिल, असे म्हणत शरद पवारांच्या नावासा पाठिंबा असल्याचे सूचवले आहे. त्यामुळे, शरद पवार हेच महाविकास आघाडीचे राज्यसभेचे उमेदवार असणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केलीय. राज्यसभेच्या उमेदवारीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्याने महाविकास आघाडीकडून कोणाचे नाव निश्चित होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही पक्ष आग्रही होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडे संख्याबळ कमी असतानाही ज्येष्ठ नेते म्हणून दोन्ही पक्षाच्या प्रमुखांना शरद पवार यांच्या नावाला पाठिंबा दिला.

पान ६ वरून

## पाटोदा येथे पोलीस पाटील भरती मुलाखत प्रक्रिया सुरळीत

सहभागी होत असून महिलांची उपस्थितीही लक्षणीय आहे. ग्रामीण प्रशासनात जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आणि आत्मविश्वास उमेदवारांमध्ये स्पष्टपणे जाणवत आहे. एकूणच, पाटोदा तहसील सभागृहात सुरू असलेली ही भरती प्रक्रिया पारदर्शकता, नियोजनबद्धता आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाची जाणीव अधोरेखित करत आहे.
पोलीस पाटील हे गावपातळीवरील अत्यंत जबाबदारीचे पद आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि गुणवत्ताधारित राहील, यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. प्रत्येक उमेदवाराला समान संधी देण्यात येत आहे कोणत्याही उमेदवाराने सदर प्रक्रियेत कोणत्याही आमिषाला आणि चुकीच्या गोष्टींना बळी पडू नये जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पार पडत आहे.श्रीमती वसीमा शेख –उपविभागीय अधिकारी पाटोदा असे त्या म्हणाल्या.

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्यावर

नियमित पाणी न मारल्यामुळे दिवसभर धुळीचे लोट हवेत उडताना दिसत आहेत यामुळे नागरिकांना शोषणाची रोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.विशेषतः सकाळी व सायंकाळी वाहतूक वाढल्याच्या वेळी परिस्थिती अधिक बिकट होत आहे. या धुळीमुळे नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ तसेच इतर आरोग्यविषयक समस्या जाणवत आहेत. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दुकानदारांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.स्थानिक व्यापारी व रहिवाशांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचे दिसून येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.दरम्यान, संबंधित विभागाने तात्काळ धूळ नियंत्रणासाठी पाणी मारण्याची व्यवस्था करावी, योग्य त्या ठिकाणी सूचना फलक लावावेत व रस्त्याचे काम युद्धपातळीवर करुन रस्त्यावर पाणी मारण्यात यावे अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## अंबाजोगाई येथील जिल्हा कारागृहाच्या संरक्षक भिंतीसाठी ४ कोटींचा निधी मंजूर

आणि पोलीस प्रशासनाच्या सुविधेसाठी हे जिल्हा कारागृह अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून या निधीमुळे जागेच्या संरक्षणाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे.

## विभागीय लोकशाही दिनाचे मंगळवारी आयोजन

तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. परंतू या महिन्याचा दुसरा सोमवार ९ मार्च , २०२६ रोजी नाथषष्ठी निमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्टी असल्याने त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस मंगळवार १० मार्च २०२६ रोजी विभागीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## आ.सुरेश धस यांची अधिवेशनात असतानाही

यावेळी उपस्थित होते.अण्णा अधिवेशनात व्यस्त असतानाही त्यांनी ऑनलाईन माध्यमातून आम्हाला वेळ दिला. आमचे प्रश्न ऐकून तातडीने अधिकाऱ्यांशी चर्चा केली. अशी सातत्यपूर्ण कनेक्टिव्हिटी आमच्यासाठी विश्वास वाढवणारी आहे. असे सुनील चौरे ग्रामस्थ सोनेगाव यांनी व्यक्त केले.

## नगराध्यक्षा यांच्या पुढाकारातून पाटोद्यात महिलांसाठी रंगोत्सव संपन्न

तसेच धांडे, पोकळे, जकाते, नागरगोजे मुळे यांच्यासह शहरातील महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.महिलांसाठी स्वतंत्रपणे आयोजित केलेल्या या रंगोत्सवामुळे सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात धुलीवंदन साजरे करण्याची संधी मिळाल्याची भावना सहभागी महिलांनी व्यक्त केली. नगराध्यक्ष दिपाली जाधव यांच्या पुढाकारामुळे शहरात सामाजिक एकोप्याचा आणि उत्सवाचा रंग अधिक गडद झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## जिल्ह्यातील चुकीचे फार्मर आयडी दुरुस्तीसाठी पर्याय उपलब्ध करा

या अनुषंगाने भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी परळी येथील पशुधन महा एक्स्पो मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून व पत्राद्वारे फॉर्मवर आयडी दुरुस्तीची मागणी केली आहे. दुरुस्तीमुळे फॉर्मर आयडीमधील वाढीव क्षेत्र कमी होऊन, शेतकऱ्यांना पीक विमा, पोखरा, महाडीबीटी सारख्या योजना राबवताना अडचणीचा सामना करावा लागणार नाही.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

## सोन्या-चांदीच्या दरात मोठी उलथापालथ

मुंबई दि.४ (प्रतिनिधी):-गेल्या काही दिवसांपासून भारतीय सराफा बाजारात सोन्या आणि चांदीच्या किमतींमध्ये सातत्याने मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहेत. कधी दर गगनाला भिडत आहेत, तर कधी त्यात अचानक मोठी घसरण होत आहे. किमतींमधील या अस्थिरतेमुळे सामान्य ग्राहकांसह गुंतवणूकदारांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोनं खरेदी करण्यासाठी हीच योग्य वेळ आहे का? असा प्रश्न सध्या सर्वसामान्यांना पडला आहे. विशेषतः लग्नसराई आणि सणासुदीच्या काळात दरांचे हे लहरीपण ग्राहकांच्या खिशावर मोठा परिणाम करत आहे.

आजचे सोन्याचे दर (४ मार्च २०२६)

२४ कॅरेट (शुद्ध सोनं) : प्रति १० ग्रॅमसाठी १,६७,६१० रुपये (प्रति ग्रॅम १६७६१ रुपये).

२२ कॅरेट (दागिन्यांचे सोनं) : प्रति १० ग्रॅमसाठी १,५३,६४० रुपये (प्रति ग्रॅम १५,३६४ रुपये).

१८ कॅरेट (कमी शुद्धता): प्रति १० ग्रॅमसाठी १,२५,७१० रुपये (प्रति ग्रॅम १२,५७१ रुपये).



## शेकडो महिलांनी लुटला 'रंगबरसे २०२६' चा आनंद

बीड दि ४(प्रतिनिधी)– रंगांचा सण 'होळी' आणि 'धुलिवंदन' निमित्त बीडमधील महिलांसाठी तेजस्विनी ग्रुप च्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'रंगबरसे २०२६' हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.

धुळवंडी दिवशी सकाळी ११ वाजेपासूनच रामकृष्ण लॉन्सचा परिसर महिलांच्या गर्दीने फुलून गेला होता. प्रसिद्ध लाईव्ह डिजेच्या तालावर महिलांनी ताल धरत नृत्याचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे नैसर्गिक (ऑरगॅनिक) रंगांचा वापर, ज्यामुळे त्वचेची काळजी न करता महिलांना सुरक्षितपणे हा सण साजरा करता आला.या भव्य सोहळ्याला श्री श्री रविशंकर स्कूल आणि ब्रुक हायजीन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महिलांनी स्वत:च्या आनंदासाठी वेळ काढावा या उद्देशाने आम्ही दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करतो. यंदा महिलांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, आमचा हा प्रयत्न यशस्वी झाल्याचे समाधान वाटते, असे प्रतिपादन ग्रुपच्या संस्थापक अध्यक्ष सोनल अरविंद सिंह पाटील यांनी यावेळी केले.सहभागी महिलांमधून काहींची निवड करून त्यांना आकर्षक सरप्राईज गिफ्ट्स देऊन सन्मानित करण्यात आले.



## विश्व हिंदू परिषदेच्या आवाहनास प्रतिसाद धुलीवंदना सण शांततेत व उत्साहात साजरा

**बीड दि ४(प्रतिनिधी)– धुलीवंदना उत्सव आनंदाने साजरा करा, परंतु आपल्या कुटुंबाची समाज बांधवांची काळजी घेऊन करावा. या सदर्भात आवाहन करण्याची मोहीम विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पदाधिकारी कार्यकर्त्यांनी राबवली. या त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होऊ लागले आहे.**

यासंदर्भात माहिती अशी की धुलीवंदनाच्या दिवशी काही लोकांकडून जे प्रकार होतात, त्यामधून कधीकधी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. यामुळे सामाजिक स्थैर्य बिघडते. ड्रंक अँड ड्रायव्हिंग करताना अपघात झाल्यास कुटुंबाचे आर्थिक आणि मानसिक नुकसान होते. तेव्हा असे प्रकार घडू नये त्यासाठी नगरसेवक राणा चव्हाण यांच्यासह विश्व हिंदू परिषदेचे शहर मंत्री प्रशांत डोरले. यांनी यासंदर्भात आपल्या कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना प्रबोधन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसे विश्व हिंदू परिषदेचे आनंद बार्शीकर, किसन चव्हाण, गणेश गुरखुदे, बाळासाहेब वनवे, नरेंद्र मेहता, आदित्य दोडके यांच्यासह त्यांच्या समूहातील कंपनीने धुळवंडीच्या दिवशी सकाळपासून भेटेल त्याला प्रबोधन करण्याचा कार्यक्रम राबवला असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेच्या संबंधित व्यक्तीकडून समजली. आपले सण उत्सव हे आपल्या आनंदासाठी असतात या उत्सवात कसल्याही प्रकारचे गालबोट लागू नये याची जबाबदारी सर्वांची आहे. कुणाचे मन दुखावेल असे प्रकार होता कामा नयेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपलेच आपल्या माणसासाठी सहकार्य आवश्यक असते. याची दखल घेण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. अशा एक ना एक प्रकारे संदेश देण्याचे काम या पदाधिकाऱ्यांनी केले. याचा परिणाम सर्वांनी धुलीवंदना सण आनंदात साजरा केला असल्याचे चित्र दिसून आले सकाळी ६ वाजल्यापासून १० वाजेपर्यंत शहरातील गुल्लो गल्लीत रंगाची उधळण होताना दिसून येत होती. तर १० च्या नंतर मात्र शहरात जणू संचारबंदी लागली असे प्रकारचे चित्र दिसून येत होते. व्यापारी वर्गाने आपले कोणतेही दुकान उघडले नाही . एवढी शांतता शहरांमध्ये दिसून येत होती. विश्व हिंदू परिषदेच्या वरील पदाधिकाऱ्यांनी धुळवंडीच नव्हे तर कोणत्याही उत्सवासाठी प्रबोधनाचे कार्य हाती घेतले आहे. याबद्दल सर्व स्तरातून या पदाधिकाऱ्यांचे कौतुक आणि अभिनंदन होऊ लागले आहे.

## बीड नगर परिषदेचे खंदक भागातील नाल्यांकडे साफ दुर्लक्ष



बीड दि ४(प्रतिनिधी) - शहरातील खंदक भागात असलेली नाली गेल्या काही काळापासून काढण्यात न आल्याने अशाप्रकारे तुडुंब भरली आहे. अजून काही दिवस जर ही नाली काढली गेली नाही तर ती ओसंडून नालीतील गलिच्छ पाणी व घाण गल्लीतील रस्त्यावर येऊन लोकांच्या घरात शिरल्याशिवाय राहणार नाही. याकडे मात्र स्वच्छता निरीक्षक मुकादम आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.


बीड नगरपालिकेमध्ये कामगार कमी मुनीम जास्त अशा प्रकारची अवस्था सतत दिसून येते. यामुळे विशेष करून स्वच्छता विभागाचे सतत बारा वाजले असल्याचे दिसून येतात. शहरातील एकूण एक नाल्या कचऱ्याने भरल्या परंतु काढायला कर्मचारी यापुढे हे समोर असताना नगरपालिका मात्र या संदर्भात काही एक निर्णय घ्यायला तयार नाही. निवडून दिलेले लोक नुसते गाजावाजा करतात परंतु तोडगा मात्र निघायला तयार नाही यामुळे शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून येते शहरातील खंडक भागात असलेली नाली पाहिली तर ही नाली सांडपाणी वाहून नेण्यासाठी आहे की कचरा वाहून नेण्यासाठी असा प्रश्न पडू लागला आहे तेव्हा न.प.ने याकडे लक्ष देऊन नाली साफ करून घ्यावी अन्यथा कचऱ्याने तोडून भरलेली नाली आपला प्रवाह रस्त्यावर आणल्याशिवाय राहणार नाही ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न होईल.

## अपमानकारक वागणूक देणाऱ्या शाळेवर कारवाई करा-अमित निर्मळ



बीड दि. ४(प्रतिनिधी):- तालुक्यातील नेकनूर येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या सचिव व कर्मचाऱ्यांनी चिमुकल्या मुलीस व तिच्या पालकास अपमान कारक वागणूक दिल्याबद्दल शाळेवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी संबंधित पालक व विद्यार्थ्यांनी समाज कल्याण आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात पालक अमित निर्मळ यांनी केली आहे.

नेकनूर येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलने दिनांक १५ ऑगस्ट रोजी सर्व महापुरुषांचे फोटो मंचावर ठेवलेले असताना केवळ संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो ठेवला नाही तो का ठेवला नाही असा सवाल विद्यार्थिनीच्या पालकांनी उपस्थित केला हाच राग मनात धरून या संस्थेचे सचिव अध्यक्ष इतर पदाधिकारी व कर्मचारी यांनी संबंधित मुलगी व तिच्या पालकाला अपमान कारक वागणूक देण्यास सुरुवात केली या संदर्भात वेळोवेळी संबंधित कार्यालयात निवेदन देण्यात आली आहेत असे असताना या संस्थेला व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना संरक्षण देऊन गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही आता तरी केवळ जातीय द्वेषातून अपमान कारक वागणूक देणाऱ्या या शाळेच्या वरिष्ठ शिक्षक, स्कूल बस चालक, व अध्यक्ष, सचिव, पदाधिकाऱ्यांवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी संबंधित विद्यार्थिनीचे पालक अमित निर्मळ यांनी समाज कल्याण आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



**चिंचोली माळी –केज तालुक्यातील कर्मवीर विद्यालय चिंचोली माळीचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिलीपराव गायकवाड (डि.के.सर) यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भाजपचे बीड जिल्हा सचिव ज्येष्ठ नेते सुनील आबा गलांडे पाटील अरुणतात्या काळे, धिरज वनवे, दगडु दळवे, राजाभाऊ नखाते, चंद्रकांत भुजबळ, हमीद शेख, अशोक वनवे, राणूजी निंगुळे, विवेक दळवे व मित्र परिवार.**

## लिंबागणेश येथे पारंपारिक पद्धतीने होलिका दहन



लिंबागणेश दि ४ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील उत्सवाचे गाव म्हणून ओळख असलेल्या लिंबागणेश येथे यंदा होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मारुती मंदिर, लिंबागणेश समोर विधीवत पूजन करून पारंपरिक पद्धतीने भव्य होलिका दहन करण्यात आली. गावातील ज्येष्ठ मंडळी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत धार्मिक मंत्रोच्चारात पूजा संपन्न झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्य हलगीच्या गजरात वातावरण दणाणून गेले. हलगीच्या तालावर तरुणांनी जल्लोष करत उत्साहात होळी प्रज्वलित केली. पुर्वी गावातील पाटलांना होलिका दहन करण्याचा मान असायचा , गावातील तरुणांनी पुढाकार घेत लोकवर्गणी जमा करून ही परंपरा पुन्हा सुरू केली आहे.यावेळी हरिओम क्षीरसागर यांनी सर्व ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

## विडा येथे धुलीवंदनाला जावई शिवाजीराव गालफाडे यांना मिळाला गर्दभसवारीचा मान

केज दि.४(प्रतिनिधी) - तालुक्यातील विडा गावात धुलीवंदनाच्या दिवशी जावयाची आगळ्यवेगळ्या पद्धतीने गर्द सवारी काढून या जावयाला ग्रामस्थांच्या वतीने आहेर करून सन्मानित करण्याची प्रथा आहे त्यानुसार यावर्षी जावई असलेले पण जवळपास ७० वर्षे वयाचे असलेले शिवाजीराव गालफाडे यांना हा मान मिळाला हास्यविनोदाने नटलेली पारंपरिक प्रथा मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ रोजी मोठ्या जल्लोषात पार पडली.

ग्रामीण संस्कृतीत जावयाला मानाचे स्थान देत त्याच्यावर प्रेमळ चेष्टा करण्याची ही परंपरा विडा गावात अनेक वर्षांपासून जपली जात आहे. साधारणपणे गावात आलेल्या जावयाची निवड करून त्याची सजवलेल्या गर्दभावरून मिरवणूक काढली जाते. मात्र यंदा घडलेल्या घडामोडींमुळे कार्यक्रमात वेगळाच रंग भरला. सुरुवातीला धरून आणलेला जावई अचानकपणे निसटल्या मुळे गावकऱ्यांमध्ये थोडी धावपळ उडाली. त्यानंतर दुसरा जावई पकडून आणण्यात आल्याने कार्यक्रम पार पडेल, असे सर्वांना वाटत होते. मात्र याच दरम्यान गेली ६० वर्षे विडा गावात वास्तव्यास असलेले शिवाजीराव गालफाडे यांना गावकऱ्यांनी अचानकपणे मानकरी म्हणून निवडले. स्वतः शिवाजी गालफाडे यांनाही आपणच गर्दभ सवारीचे मानकरी ठरू, याची अजिबातकल्पना नव्हती. आपल्याला पकडतील आणि आपलीच गर्दभ सवारी काढतील असे त्यांना वाटले नव्हते. गावकऱ्यांनी हसतखेळत त्यांना सजवून गर्दभावर बसवले आणि ढोल- ताशांच्या गजरात मिरवणूक काढली. महिलांच्या उखाणे, पारंपरिक ओव्या, टाळ-मृदुंगाच्या नादात आणि तरुणांच्या जल्लोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त



सहभाग नोंदवला. शिवाजीराव गालफाडे यांनीही हा मान आनंदाने स्विकारत परंपरेचा सन्मान राखला. अनपेक्षित वळणा मुळे रंगलेली यंदाची जावयाची गर्दभसवारी ग्रामस्थांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान शिवाजीराव गालफाडे यांच्या चिरंजीव यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, एकीकडे थोडे दुःख वाटते परंतु गावाची प्रथा परंपरा चालू राहीली पाहिजे म्हणून सहमती दर्शवली आहे.

## केज येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व १०८ कुंडी महा विष्णु महायज्ञ

केज दि ४(प्रतिनिधी) -बीड रस्त्यावर असलेल्या शहरातील भगवान श्रीकृष्ण आश्रम येथे श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग, तसेच ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ ते गुरुवार दि.१९ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या महा विष्णु यज्ञ, राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संगीत रामकथा प्रवक्ते ह.भ.प. रामराव महाराज ढोक करणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता महाविष्णु १०८ कुंडी यज्ञ दुपारी २ ते ५ संगीत तुलसी रामायण कथा, सायंकाळी धार्मिक विधी, कीर्तन व हरि जागराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी दररोज महाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**बीड –शहरातील संत नामदेव नगर भागात धुळवंडीचा जल्लोष साजरा करताना तरुणाई.**

## आ.सौ. मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर विद्यालयात शैक्ष.साहित्य वाटप

चिंचोली माळी दि ४ (प्रतिनिधी):- केज मतदारसंघाच्या आमदार सौ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मूकबधिर निवासी विद्यालय, उमरी येथे भारतीय जनता पार्टी व सोनू सावंत यांच्यातर्फे विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमावेळी भगवान केदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर, युवा नेते सोनू भैय्या सावंत, पत्रकार प्रकाश मुंडे, विक्रम डोईफोडे, विकास जाधव, अशोक मुळे, नाना मुळे, कृष्णा मुळे, बालासाहेब मुळे आणि गणेश मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर यांनी आमदार नमिता मुंदडा यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे आभार जाधव मॅडम व सूर्यवंशी मॅडम यांनी मानले.

## शिरूर कासारमध्ये दीड शतकांपासून होळीच्या दिवशी कालिका देवीच्या सोंगाची अनोखी परंपरा

शिरूर कासार दि ४ (प्रतिक भांडेकर)- शेंदूर चर्चीत अष्टभुजा असलेल्या कालिका देवीचे सोंग घेऊन होळीला प्रदक्षिणा घालण्याची मागील दीड शतकापासून समृध्द परंपरा आजतागायत शिरूरच्या ग्रामस्थांनी ती जपली आहे. परंपरेने गावातील गोसावी मठातून एका विशिष्ट तालावर दिवत्याच्या प्रकाशात सवाद्य मिरवणूक गांधी चौकात पोहचल्यांनतर होळीला प्रदक्षिणा घालून पुन्हा त्याच मार्गाने मूळस्थानी जाऊन थांबण्याची परंपरा यावर्षीही उत्साहात झाली.



कालिका देवी कासार समाजाचे कुलदैवत असून मागील दीड शतकापासून ही सोंगाची परंपरा ग्रामस्थांनी श्रद्धेने शिरूरकरांनी जपली आहे. शिरूरमध्ये होळीच्या दिवशी गावातील भाविक बबन भांडकर हे कालिका देवीचे भौग घेतात.मुख्य सोंगाशिवाय पुढे वाध्या, मुरळी हाती पोत घेऊन नाचतात. आजपर्यंत दिवंगत भाऊराव सुतार, मारुती माळी, किसन तुटके गाडेकर, मोहन माळी, राणू बोटे, एकनाथ सुतार, आश्रजी गायकवाड, गणपत पवार, दगडू शिगाडे, जाणुभाई ताशावाले, पत्रकार अशोकराव भांडेकर, परमेश्वर गाडेकर, भारत गाडेकर यांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. आता ही पूर्वजांची परंपरा दत्तू माळी, दादा हरिदास, देवीदास पाटील, विष्णू देशमुख, लक्ष्मण थोरात, भाऊ तळेकर, शिवा गाडेकर, आसाराम गाडेकर, बबन माळी, विनोद गाडेकर, ज्ञानोबा तळेकर, रामू सुतार, शरद गाडेकर, अभिलाश गाडेकर यांनी सुरू ठेवलेली आहे.अष्टभुजा देवीचे सोंग घेनारे बबन भांडेकर है दिवसभर उपवास धरतात पादत्राणे सुद्धा पायात घालत नाही आजपर्यंत दिवंगत विश्वनाथ पाटील, विठोबा घोरपडे, कालूराम गिरी हरिदास ,विश्वनाथ झिरपे, भगवान भांडेकर, दशरथ तळेकर यानी मोठ्या निष्ठेने ही परंपरा सांभाळली माया ही परंपरा बबन भांडेकर हे सांभाळत आहेत.

## बीडच्या शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन व माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



बीड दि ४ (प्रतिनिधी) - येथीलशासकीय तंत्रनिकेतन या संस्थेत दि. २७फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन तसेच माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला.

या मेळाव्याचे व स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सा.बां. विभाग छत्रपती संभाजीनगर परिमंडळचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या हस्ते झाले. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपायुक्त, स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगरचे उपायुक्त रवींद्र जोगदंड यांची विशेष उपस्थिती लाभली. सदरील कार्यक्रमात विदयार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना अतुल चव्हाण यांनी मोबाईल / स्मार्टफोनचे फायदे व तोटे यांची माहिती दिली व त्याचा योग्य वापर करण्या सबंधी सांगितले. रविंद्र जोगदंड यांनी थोर महापुरुष छत्रपती शिवाजी महाराज व स्वा. वि.दा. सावरकर यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेऊन स्वतः ची जडणघडण करावी असे सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांनी मराठी भाषा गौरव दिनाबद्दल माहिती दिली डी.जी. वाघ यांनी प्रास्ताविक करताना जिमखाना अंतर्गत वर्षभरात केलेल्या विविध कार्यक्रमाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.श्री. यु.व्ही. बनसोडे यांनी केले. यानंतर संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी शेलापागोटे, अंताक्षरी, विविध कलाशिक्षकेतर कर्मचारी यांनी शेलापागोटे, अंताक्षरी, विविध कला गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला तर दि.२८ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष संतोष लड्डा, उपाध्यक्ष एम. के. निनाळे, सचिव पवन रामदासी तसेच माजी विद्यार्थी सागर वडगावकर , रुपेश जाधव, मोमीन एम.ए. , अंकिता कुलकर्णी, मनीषा रोंढे, राहुल खडके , स्वप्नील निंबाळकर, संदीप शेटे , प्रदीप नाळे व इतर विविध पदावरील माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन एस.एस. सिरसाट यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांनी केला.

# शिरूर कासारमध्ये दीड शतकांपासून होळीच्या दिवशी कालिका देवीच्या सोंगाची अनोखी परंपरा



शिरूर कासार दि.४(प्रतिक भांडेकर):- शिरूर कासार होळीच्या दिवशी सायंकाळी शेंदूर चर्चीत अष्टभुजा असलेल्या कालिका देवीचे सोंग घेऊन होळीला प्रदक्षिणा घालण्याची मागील दीड शतकापासून समृध्द परंपरा असून आजतागायत शिरूरच्या ग्रामस्थांनी ती जपली आहे. परंपरेने गावातील गोसावी मठातून एका विशिष्ट तालावर दिवत्याच्या प्रकाशात सवाद्य मिरवणूक गांधी चौकात पोहचल्यांनतर होळीला प्रदक्षिणा घालून पुन्हा त्याच मार्गाने मूळस्थानी जाऊन थांबतात.

कालिका देवी कासार समाजाचे कुलदैवत असून वर्षभरात वेगवेगळ्या कुलाचाराबरोबरच वर्षातून दोन वेळा हिरवे पातळ नेसून वाघावर बसलेली अष्टभुजा देवी शेंदुर चचीत असते. हाती तलवार, ढाल ही आयुधे असतात.मागील दीड शतकापासून ही सोंगाची परंपरा ग्रामस्थांनी श्रादेने जपली आहे. या मिरवणूकीत गावातील भाविक सहभागी होतात. शिरूरमध्ये होळीच्या दिवशी गावातील भाविक बबन भांडकर हे कालिका देवीचे भौग घेतात. गावातील होळीला प्रदक्षिणा घेतली जाते.शिरुरमधील गोसावी महापासून निघून गांधी चौकातील होळीला घातली जाते प्रदक्षिणा

### परंपरा जोपासणारे भाविक काळाच्या पडद्याआड

मुख्य सोंगाशिवाय पुढे वाध्या, मुरळी हाती पोत घेऊन नाचतात. आजपर्यंत दिवंगत भाऊराव सुतार, मारुती माळी, किसन तुटके गाडेकर, मोहन माळी, राणू बोटे, एकनाथ सुतार, आश्रजी गायकवाड, गणपत पवार, दगडू शिगाडे, जाणुभाई ताशावाले, पत्रकार अशोकराव भांडेकर, परमेश्वर गाडेकर, भारत गाडेकर यांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. आता ही पूर्वजांची परंपरा दत्तू माळी, दादा हरिदास, देवीदास पाटील, विष्णू देशमुख,लक्ष्मण थोरात, भाऊ तळेकर, शिवा गाडेकर, आसाराम गाडेकर, बबन माळी, विनोद गाडेकर, ज्ञानोबा तळेकर, रामू सुतार, शरद गाडेकर, अभिलाश गाडेकर यांनी सुरू ठेवलेली आहे.

### सोंगापुढे हाती दिवटी घेऊन राळ उडवण्याची परंपरा

ज्ञानोबा सोनवणे इत्यादी विशिष्ट लयीत वाद्ये वाजवतात.आता त्याची जागा ढोल, बासरी आदिनी घेतली आहे सौगापुढे हाती दिवटी घेऊन राळ उडवण्याची हातोटी कला ही वेगळीच पहायल मिळते. आता शिवा गाडेकर हि कला सांभाळून आहेत.

### सोंग घेणारा दिवसभरठेवतो उपवास

अष्टभुजा देवीचे सोंग घेनारे बबन भांडेकर है दिवसभर उपवास धरतात पादत्राणे सुद्धा पायात घालत नाही आजपर्यंत दिवंगत विश्वनाथ पाटील, विठोबा घोरपडे, कालूराम गिरी हरिदास ,विश्वनाथ झिरपे, भगवान भांडेकर, दशरथ तळेकर यानी मोठ्या निष्ठेने ही परंपरा सांभाळली माया ही परंपरा बबन भांडेकर हे सांभाळत आहेत.

# प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा ऑनेस्टी शाळेचा बाल महोत्सव- प्रा.लबडे

माजलगाव दि.४ (प्रतिनिधी):- प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा ऑनेस्टी शाळेचा बाल महोत्सव असल्याचे प्रा. विकास लबडे यांनी सांगितले. येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूलच्या पंधरावा बाल महोत्सवाच्या उद्धाटनात एक मार्च रोजी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपाध्यक्ष डॉ. सचिन डक हे तर प्रमुख पाहुणे से.नि. शिक्षक बळीराम फपाळ, रवी आदमाने, विठाई हॉस्पिटलचे डॉ. श्रीनिवास शिंगणे, ऐश्वर्या देशमुख, मुख्याध्यापक गवळी यांची उपस्थिती होती. प्रिन्सिपल गौरी कानडे यांनी शाळेचा सर्व शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक अहवाल सादर केला. प्रास्ताविकात डॉ.विठ्ठल वाघ म्हणाले की, गेले १४ वर्षापासून सातत्याने नवनवीन दर्जेदार शैक्षणिक उपक्रम राबवून प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करत आहोत. बळीराम फपाळ म्हणाले की ऑनेस्टी पब्लिक शाळेचे नियोजन व शैक्षणिक कार्य हे विचाराच्या पलीकडे आहे. अध्यक्षीय समारोप डॉ सचिन डक यांनी केला. बेस्ट स्टुडन्ट श्रेयस शिवाजी व्यवहारे, अथर्व शिवाजी धरपडे. बेस्ट अटेंडन्स आदर्श अमोल आलझेंडे, मैथिली रमेश रासवे.बेस्ट टीचर सोनाली राहुल नाईकवाडे, अनुजा गिलानकर बेस्ट अँकर नंदकुमार कुलकर्णी, बेस्ट कोरिओग्राफर अंकिता भुतडा इत्यादी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन नंदकुमार कुलकर्णी व जानवी विठ्ठल वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन अमृता तोर यांनी मानले. कार्यक्रमासाठी सुनीता वैरागे, प्रभा हरकळ जयश्री जाधव, पल्लवी गायकवाड क्रीडा प्रमुख अश्विनी घुबडे , सोनाली नाईकवाडे, सुनिता सोळंके सरिता सोनवणे, वर्षा दीक्षित, वावळकर , दिपाली कोकाटे, सुशीला जोशी, मीरा चिंचोलकर, श्रुती कुलकर्णी, सोनाली यादव ,दीपा शिंदे, राजश्री महामुनी, शिक्षकेतर



अश्विता टाक, लता गाडेकर, श्रीनिवास तोर ,मानसी वाघ, प्रांजल देशमुख, शरद धुमाळ, पिराजी मुसळे, राजू भैया शेख , आदर्श गाडेकर यांनी पुढाकार घेतला.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मेंदू आजाराच्या उपचारासाठी रामराव पोळ यांना आर्थिक मदत

किट्टी आडगाव दि.४ (प्रतिनिधी)- हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन तर्फे बीड जिल्हा वैद्यकीय समन्वयक उज्वला ताई भोपळे त्यांच्या पुढाकाराने मेंदू आजार झालेल्या गेवराई तालुक्यातील मौजे मानमोडी येथील रामराव तुकाराम पौळ यांच्यासाठी ४८ हजार ३५० रुपयाची आर्थिक मदत मिळाली पौळ यांना मेंदूच्या आजारामूळे सूर्या हॉस्पिटल बीड येथे उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय उपचाराचा खर्च २ लाख रुपये येत असताना यांची परिस्थिती सक्षम नसल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय उपचारासाठी बीड जिल्ह्याच्या वैद्यकीय समन्वयक उज्वलाताई भोपळे यांच्या पुढाकाराने ४८ हजार ३५० रुपयांची मदत करण्यात आली याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,खा.डॉ.श्रीकांत शिंदे ,शिवसेना नेता तथा विधान परिषद उपसभापतीडॉ. निलमताई गोरे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे , राज्य समन्वयक रामहरी राऊत सर, बीड जिल्हा समन्वयक ॲड.उज्वलाताई भोपळे, माजलगाव ता. समन्वयक वैशालीताई आगे. यांचे त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर रामराव पौळ यांनी आभार व्यक्त केले.

# जुनैरा मेहरिन व अलविरा फातेमा यांचा जीवनातील पहिला रोजा पूर्ण



बीड दि ४ (प्रतिनिधी)- सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून सर्वत्र भक्तीभाव, आनंद आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळत आहे. या पवित्र महिन्यात रोजा (उपवास) ठेवणे फर्ज मानले जाते. त्यामुळे महिला, पुरुष, युवक-युवती यांच्यासह लहान मुले-मुलीही उत्साहाने रोजे ठेवून नमाज अदा करतात व कुरआन पठण करून अल्लाहची इबादत करतात.याच पार्श्वभूमीवर बीड येथील ड. रईस पठाण यांची पुतणी तथा इम्रान पठाण यांची कन्या जुनैरा मेहरिन (वय ९ वर्षे) आणि अलविरा फातेमा (वय ७ वर्षे) या दोन चिमुकल्यांनी मंगळवार, दि. ३ मार्च रोजी आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. दिवसभर उपवास पूर्ण करून त्यांनी अत्यंत श्रद्धा व संयमाने अल्लाहची इबादत केली.पहिल्या रोजाच्या निमित्ताने संध्याकाळी सूर्यास्तानंतर मोमीनपुरा बायपास रोड येथील सिटी लॉन्स येथे त्यांचा इफ्तार कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी दोन्ही मुलींचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. कुटुंबीयांनी त्यांच्या या धार्मिक जिद्दीचे कौतुक करत आनंद व्यक्त केला.या पवित्र प्रसंगी परिवारात उत्साहाचे वातावरण असून दोन्ही चिमुकल्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. त्यांच्या या धार्मिक प्रेरणादायी कृतीमुळे इतर मुलांनाही सद्गुणांचा आदर्श मिळत आहे.

# संगीता विलास पटवा यांचा वाढदिवस जि.प.शाळेत विद्यार्थ्यांच्या समवेत



पिंपळवंडी दि.४(प्रतिनिधी)- मा.ग्रा.पं. सदस्या संगीता विलास पटवा यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडी येथे त्यांचा शाळेकडून सन्मान करण्यात आला. सर्व शिक्षकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.हा सन्मान त्यांच्या आयुष्यभराच्या मायेचा,त्यागाचा व समाजसेवेचा गौरव ठरला. वाढदिवसाचे औचित्य साधत शाळेला आवश्यक असलेले हॅन्डवॉश स्टेशन भेट देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पेन वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन देण्यात आले.मा.ग्रा.पं. सदस्या संगीता विलास पटवा यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडी येथे त्यांचा शाळेकडून सन्मान करण्यात आला. सर्व शिक्षकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.हा सन्मान त्यांच्या आयुष्यभराच्या मायेचा,त्यागाचा व समाजसेवेचा गौरव ठरला. वाढदिवसाचे औचित्य साधत शाळेला आवश्यक असलेले हॅन्डवॉश स्टेशन भेट देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पेन वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन देण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक येवले सर, केंद्रप्रमुख नरसाळे सर,बी.आर.पवार सर,एस.आर.पवार सर,लटपटे सर, नवले मॅडम,होळकर मॅडम तसेच समृद्धी पटवा मॅडम उपस्थित होत्या. यावेळी एस.आर.पवार सर यांनी मनोगत व्यक्त करताना विलास शेठ पटवा व संगीता विलास पटवा हे दाम्पत्य सामाजिक क्षेत्रात स्वतःला वाहून घेतलेले कुटुंब असून परिसरातील अनेक रुग्णांचे प्राण त्यांच्या सहकार्यामुळे वाचलेले आहेत असे नमूद केले.केंद्रप्रमुख नरसाळे सर यांनी शुभेच्छा देताना सामाजिक कार्यातील त्यांच्या योगदानाचे कौतुक केले समृद्धी पटवा यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की,सामाजिक कार्याचा वसा आणि वारसा मला माझ्या आई-वडिलांकडून मिळाला आहे.त्यांच्या संस्कारांमुळेच समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळते.सदर उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळी आणि प्रेरणादायी दिशा समाजासमोर आली आहे.

# विद्यामंदिर इंग्लिश स्कूलचा बाल महोत्सव उत्साहात



दिंद्रुड दि.४(प्रतिनिधी)-येथील विद्यामंदिर इंग्लिश स्कूल या शाळेमध्ये वार्षिक बाल महोत्सव उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी चिमुकल्यांनी विविध घटकावर नाविन्यपूर्ण नृत्य करून प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून स्वातंत्र्य सेनानी रामराव पाटील प्रशालाचे मुख्याध्यापक परमेश्वर गायकवाड तर उद्धाटक म्हणून संभाजी कटारे सीनियर पोलीस इन्स्पेक्टर मुंबई हे उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजी पं. स.सदस्य कैलासआप्पा ठोंबरे, बेंद्रेसर , खापे सर, हजारे सर बारवकर सर, अजय कोमटवार, शिवसेना ता.उपप्रमुख नारायण चांदबोधले, वैभव देशमाने तसेच वैद्यनाथ कन्स्ट्रक्शन चे अंगद कराड, पालक प्रतिनिधी म्हणून युवराज काशीद, पत्रकार प्रकाश काशिद, नितीन वाघमोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यामंदिर शाळेचे अध्यक्ष बळीराम पारेकर यांनी केले. मोहिनी कटारे मॅडम यांनी छान सुत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. पवार टीचर यांनी अहवाल वाचन केला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध चित्रपट गीते, मराठी लावणी, शिवगीत, मोबाईल चा दुष्परिणाम वर आधारित ॲक्ट, 'अनपढ़ नेता' था यावरती छोटी नाटिका सुंदर प्रकारे सादर केली. रुही राजेंद्र बडे या छोट्या मुलीने केलेल्या मराठी लावणी नृत्यामुळे प्रेक्षक भारावून गेले होते. या कार्यक्रमासाठी गणेश जाधव सर, गोपाळ कटारे, सौ.रेणुका पारेकर, मोहीनी कटारे,शारदा वनवे,साक्षी पांचाळ, सारिका क्षिरसागर,पवार आदींनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेतली. शेवटी गोपाळ कटारे यांनी सर्वांचे आभार मानले.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात पर्यावरणपूरक होळी रंग प्रात्यक्षिक



बीड दि ४(प्रतिनिधी) - येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला विज्ञान वाणिज्य् महाविद्यालयातील गृहशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ होळी सणाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक होळीचे रंग बनवून ते विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून दाखवण्यात आले. नैसर्गिक रंग कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. यामध्ये बीटरूट, झेंडू फुले, गुलाब, जरबेरा, पालक पाने, हळद, कोळसा या निसर्गनिर्मित वस्तू शरीरासाठी उपयुक्त व नैसर्गिक सामुग्रीचा वापर करून विद्यार्थ्यांना कोरडे रंग व ओले रंग यांचे प्रात्यक्षिक करून पर्यावरणपूरक होळीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळेस पिंगळे पब्लिक स्कूल, बीड येथील विद्यार्थ्यांनी सुद्धा या प्रदर्शनाला भेट देऊन व माहिती करून घेतली.हे नैसर्गिक रंगांची रंगनिर्मिती गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना फटाले, प्रा. शाम कुरे, डॉ. दादासाहेब खोगरे यांनी परिश्रम घेतले व नैसर्गिक रंगांबद्दल व त्याचे आरोग्यदायी फायदे सर्वांना माहिती करून दिली.

# मादळमोहीतील सप्ताहाची आज सांगता

मादळमोही दि ४(प्रतिनिधी):- सालाबाद प्रमाणे या ही वर्षी श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त मादळमोही येथील श्री संत तुकाराम महाराज संस्थान वर ह. भ. प. महंत श्री संभाजी महाराज ( उत्तराधिकारी श्री क्षेत्र नारायण गड ) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज गुरुवार पाच मार्च रोजी ह. भ. प. प. पू. गुरुवर्य महंत शिवाजी महाराज ( श्री क्षेत्र संस्थान नारायण गड ) यांच्या काल्याचे कीर्तनाने होणार आहे तरी या काल्याचे कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ गावकऱ्यासह पंचक्रोशीतील नागरिकांनी घ्यावा असे आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तुलसी समूहाची महिला मॅरेथॉन आता सामाजिक न्याय भवन येथुन होणार

बीड दि ४ (प्रतिनिधी)- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'तुलसी शैक्षणिक समूह, बीड' यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी रमजान ईदमुळे वाहतूक आणि नियोजनाच्या सोयीसाठी स्पर्धेच्या प्रारंभ स्थळात बदल करण्यात आला असून, आता ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथून सुरू होणार आहे. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ठीक ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते या मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराची ही स्पर्धा सामाजिक न्याय भवन येथून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा त्याच ठिकाणी समारोप होईल. पूर्वीचे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे स्थळ बदलून आता 'सामाजिक न्याय भवन' निश्चित करण्यात आले आहे, याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी.स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली आहे. १० ते १८ वर्षे वयोगट आणि १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांना अनुक्रमे १५हजार ,१० हजार व ७ हजार अशी रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.सर्व सहभागी स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. लहान गटासाठी ५० तर मोठ्या गटासाठी २०० असे नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.या भव्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक महिला व विद्यार्थिनींनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी पूर्ण करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा. महिला शक्तीचा जागर करणाऱ्या या उपक्रमात स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शेख सादिक रिजवान हुसेन याचा पहिला रोजा



बीड दि ४(प्रतिनिधी)- दिलदार फाऊंडेशन बीड चे संस्थापक अध्यक्ष शेख दिलदार शेख ईस्माईल यांचे नातु, शेख सादिक रिजवान हुसेन याने वयाच्या सातव्या वर्षी लहान वयात आपला आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला.सध्या रमजानचा पवित्र महिना उन्हाळ्यात सुरू आहे.ऊनही तप्त आहे अशा अवस्थेत सादिक ने संयम आणि श्रद्धेचे सुंदर उदाहरण दाखवत दिवसभर रोजा ठेवला.मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज, दुवा, कुराण पठण करत त्याने दिवस व्यतीत केला.

# आरडीएसएस योजने अंतर्गत एकदरा,तेलगांव खु.,खेर्डा खु.येथे नविन फिडर द्या

## उर्जा मंत्री मेघनादिदी बोर्डीकर यांचेकडे रमेश शेंडगे यांची मागणी



माजलगाव दि.४ ( प्रतिनिधी)- तालुक्यातील एकदरा, तेलगांव खुर्द, खेर्डा खुर्द या गावांची वाढती लोकसंख्या व विजेचा वापर लक्षात घेत सध्या कार्यरत असलेल्या सिंगल फेज डिपी नेहमीच जळत आहे. त्यामुळे वरिल गावांसाठी आरडीएसएस योजने अंतर्गत नविन फिडर देण्यात यावे अशी मागणी भाजपाचे माजलगाव विधानसभा विस्तारक रमेश विठ्ठलराव शेंडगे यांनी उर्जा मंत्री मेघनादिदी बोर्डीकर यांचेकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वरिल गावांची लोकसंख्या व विजेचा वाढता वापर पाहता कार्यरत असलेले सिंगल फेज विद्युत रोहित्र नेहमीच जळत आहे. परिणामी गावांत लाईट राहत नाही व लाईटची मोठी अडचण निर्माण होत आहे व ३३/११ उपकेंद्र तालखेड येथे जवळा फिडर नविन गावठाण झाले आहे परंतु एकदरा, तेलगांव खुर्द, खेर्डा खुर्द या गावांचे मात्र नविन फिडर झाले नाही ते नविन करून द्यावे अशी मागणी भाजपाचे माजलगाव विधानसभा विस्तारक रमेश विठ्ठलराव शेंडगे यांनी उर्जा मंत्री मेघनादिदी बोर्डीकर यांचेकडे केली आहे.

# भारतीय सैन्याच्या शौर्य आणि धैर्यातूनच ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले - ब्रिगेडियर हेमंत महाजन

माजलगाव दि.४(प्रतिनिधी)- भारतीय सैन्याच्या शौर्य आणि धैर्यातूनच ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले असे प्रतिपादन ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी केले. येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेत 'ऑपरेशन सिंदूर- सामर्थ्य भारताचे' या विषयावर बोलत होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, युध्दात शस्त्रापेक्षा शस्त्र चालवणारा महत्त्वाचा असतो, आधुनिक शस्त्रसाठा व राष्ट्रीय नेतृत्वाची भूमिका युद्धात महत्त्वाची असते. ७०% शस्त्र भारतात तयार होतात व ते उच्च प्रतीचे आहेत. शौर्य आणि धैर्यातूनच ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. आपला देश बऱ्याच बाबतीत स्वयंपूर्ण असून काही बाबतीत तो इतर देशावर देखील अवलंबून आहे. अध्यक्षस्थानी भाशिप्र संस्थेचे प्रवीण सरदेशमुख, अमरनाथ खुर्पे, विष्णुपंत कुलकर्णी, संजय गुरव, विष्णु सोनवणे, सुरेंद्र रेदासणी, अंड. विश्वास जोशी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, मुख्याध्यापक संतोष लिंबकर,




मुख्याध्यापिका सुमती भारती, प्राचार्या वंदना मिटकरी, वर्षा कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन रतन गिरी यांनी केले तर आभार राजाभाऊ आढाव यांनी मानले. वैयक्तिक पद्य चैतन्य आहेर यांनी गायले. सत्राची सांगता विजयी शंखनाद व संपूर्ण वंदेमातरम् ने झाली. विजयी शंखनाद पी.एस.आय. अतुल कचरे यांनी वाजवला तर संपूर्ण वंदेमातरम् चैतन्य आहेर, कुणाल कुलकर्णी तसेच संगीत विभागाच्या चमुने सादर केले. यावेळी सर्व स्थानिक संस्था सभासद, शहरातील डॉक्टर, वकील, पत्रकार, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, महिला- पुरुष पालक, सेवानिवृत्त शिक्षक, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# हर्षलनची सीए पदाला घातली गवसणी

आष्टी दि ४(प्रतिनिधी)-आष्टी तालुक्यात सतत पडणाऱ्या दुष्काळी भागातील गहूखेल सारख्या अति दुर्गम डोंगराळ भागात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले ज्ञानदेव म्हस्के यांची घरची परिस्थिती तशी हलाखीचीच. दहावी नंतर कौशल्य विकास आणि उद्योजक ( खढख ) अंतर्गत व्यावसायिक व विविध तांत्रिक आणि गैर- तांत्रिक ट्रेडमध्ये इलेक्ट्रिशियन शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात शहर गाठून पुणे, हैद्राबाद याठिकाणी काम केले.सध्या ते सुपा येथे खाजगी कंपनीत इलेक्ट्रिशयन म्हणून काम करत आहेत त्यांना दोन मुलं असून एक शिक्षण घेत आहे तर दुसऱ्या मुलगा हर्षल... हर्षलने मात्र आई वडिलांच्या कष्टाचे चीज केले व त्यांच्या स्वप्नाला मोठी उभारी दिली. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पुण्यासारख्या महागड्या ठिकाणी मालानी,सोमानी, चांडक असोसिएट डेक्कन पुणे येथे त्याची आर्टिकल शिप झालेली आहे परंतु अजूनही एक महिना बाकी असताना त्याने अगोदरच परीक्षा दिल्याने उत्तीर्ण होऊन त्याचा रिझल्ट लागलेला आहे आणि त्याला अडीच वर्षानंतर फायनल देता येते त्यामुळे त्यांनी खूप अभ्यास करून फायनल दिली आणि पहिल्याच प्रयत्नात पास झाला आहे अभ्यासात सतत सातत्य ठेऊन कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर शिक्षण घेऊन चार्टर्ड अकाउंटंटच्या (सीए) परीक्षा पास झाला आहे.शिक्षणामुळे जीवनात क्रांती घडते, परिस्थिती कितीही बिकट आणि हलाखीची असली तरी शिक्षणातून आर्थिक क्रांती घडविता येते,असे बाळकडू वडिलांनीच त्याला दिले होते याची प्रचिती त्याने आपल्या कृतिशील कार्यातून दाखवून दिली आहे.हर्षलच्या आईने शिवणकाम करून आपल्या वडिलांच्या मेहनतीला साथ दिली, वडिलांनीही मेहनतीचे व कठीण काम करत त्यांनी या कंपणीला



आपली लक्ष्मी समजून अखंडपणे काम करून प्रसंगी वोअर टाईम करून संसाराचा गाडा हाकत आपले काम सुरू ठेवले.कोरोनाने ज्ञानदेव म्हस्के यांना घेरले होते,दवाखान्यात मोठया प्रमाणात खर्च करावा लागला, आर्थिक व मानसिक संकट कोसळले. उत्पन्नाचे स्रोत ठप्प आणि आरोग्याची भीती अशा दुहेरी संकटांना सामोरे जात असतानाही एका जिद्दी वडिलांनी हार न मानता परिस्थितीशी दोन हात केले पण मुलाच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही.हर्षल ने पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण सावेडी येथे घेतले.उच्च माध्यमिक शिक्षण ११ व १२ वी अहिल्यानगर येथे रेसिडेंशील घेऊन बी. कॉम.ची पदवी न्यू आर्ट अँड कॉमर्स येथून पूर्ण केले,त्यानंतर सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाला.शिक्षणामुळे जीवनात आमूलाग्र बदल होतो. वडिलांनी प्रतिकूल परिस्थितीतून आम्हाला शिक्षणासाठी सतत पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.त्याची जाणीव ठेवून शिक्षणातून वैभव निर्माण करण्याचा प्रयत्न मी केला आहे. आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक पाल्याने जाणीव ठेवली तर जीवनात कोणत्याच बाबींची कमतरता भासणार नाही.असे हर्षल म्हस्के, सीए. याने नमूद केले.

# अनाथ मुलांच्या हस्ते लघुचित्रपट 'काळीमा' पोस्टरचे अनावरण




जामखेड (प्रतिनिधी) : येथील निवारा बालगृह, मोहा फाटा, समता भूमी बीड रोड येथे ॲड.अरुण (आबा) जाधव नगरसेवक यांचा 'काळीमा'या शॉर्ट फिल्मच्या पोस्टरचे अनावरण अनाथ मुलांच्या हस्ते करण्यात आले.

'काळीमा'या शॉर्ट फिल्मची टॅगलाईन''विशिष्ट जातीला लागलेला कलंक''अशी आहे.भटके विमुक्त,आदिवासी जातीला लागलेला ठिपका,म्हणजेच कलंक याचे प्रतीक म्हणून या चित्रपटाला 'काळीमा'हे नाव देण्यात आले आहे.आणि हाच काळीमा नावाचा लघु चित्रपट येणाऱ्या ८ मार्च महिला जागतिक दिनानिमित्ताने निवारा बालगृह मोह फाटा समता भूमी येते हजारोच्या संख्येने प्रदर्शित होणार आहे.यावेळी बोलताना अरुण (आबा) जाधव यांनी भटके-विमुक्त आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. भटके-विमुक्त समाजावर, आदिवासी यांच्यावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार आणि जाळपोळ,जीवघेणे हल्ले,सामाजिक कलंकाच्या पार्श्वभूमीवर ही शॉर्ट फिल्म तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले आहे.अरुण (आबा) जाधव स्वतःभटके-विमुक्त समाजातून आलेले असल्यामुळे या समाजाच्या वेदना आणि संघर्षाची त्यांना जवळून जाणीव असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संतोष चव्हाण सर यांनी केले.या शॉर्ट फिल्मची कथा,पटकथा आणि दिग्दर्शक :- सचिन चव्हाण यांनी केले असून निर्माते:-उमाताई जाधव यांनी जबाबदारी सांभाळली आहे.या कार्यक्रमास सचिन भिंगारदिवे, रेश्मा बागवान, बापू ओव्होळ,ऋषिकेश गायकवाड,संगीता केसकर, गौतमी गंगावने, छाया मोरे,भक्ती पवार, संदीप आखाडे व बालगृहातील मुले, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वैजीनाथ केसकर सर यांनी केले.

# आष्टीत रंगली 'विकासा'ची धुळवंड ; पाण्यासाठी दोन माजी आमदार एकवटले

## आष्टी, पाटोदा,शिरूरच्या पाणी प्रश्नावर मंथन तर जनआंदोलन उभारण्याचा इशारा



आष्टी दि ४ (प्रतिनिधी)- रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात मात्र एका वेगळ्याच'विकासाच्या धुलवडी'चा रंग पाहायला मिळाला.मतदार संघातील शाश्वत विकासाचा आणि प्रामुख्याने 'पाणी' या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे या दोन नेत्यांनी एकत्र येत रणशिंग फुंकले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीने मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची नांदी दिली असून,तिन्ही तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी याला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला आहे.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवारी दि.३ मार्च रोजी ही विशेष बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे (पाटोदा), आष्टी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे,माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर, पराग आप्पासाहेब राख,पाटोदा कृ.उ.बा.समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,हनुमंत थोरवे,आरपी आयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी सभापती नियामत बेग,माजी सभापती अनिल जायभाये,सतीश मामा झगडे,सरपंच दादा जगताप,माऊली वाघ,सुदाम काका झिंजूरके,हरिभाऊ जंजिरे,संजय विधाते, नानाभाऊ वाडेकर, संजय चंदनशिव,सोपान गाडे,आबासाहेब तावरे, आदिनाथ गवळी,भागवत वारे,बबन सांगळे,बाळासाहेब शेकडे,विकास वनवे, गणेश सांगळे,आदेश निमोनकर,सचिन नालकोल,संजय नालकोल,महारुद्र खेडकर,धोंडीबा सांगळे,सूर्यभान सांगळे, दीपक बोराडे आदी मान्यवर व पाटोदा,शिरूर तालुक्यातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांचा वनवास कायमचा संपवण्यासाठी पाणी कसे उपलब्ध होईल यावर दोन्ही नेत्यांनी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण मंथन केले.

# शिवणी ग्रामपंचायतीतील रोजगार हमी कामांमध्ये गैरप्रकार ?

## रस्त्याची कामे न करताच बिले उचलल्या बाबत शिंदे यांची गटविकास अधिकाऱ्याकडे केली तक्रार

बीड दि ४ (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील शिवणी ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात आलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (रोजगार हमी योजना) कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत सखोल चौकशीची मागणी शिवणी येथील दत्तात्रय तुकाराम शिंदे यांनी पंचायत समिती बीडचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

अर्जात नमूद केल्यानुसार, रोजगार हमी योजनेतून करण्यात आलेल्या पाणंद रस्त्यांच्या कामांमध्ये अत्यंत दर्जाहीन काम झाले असून काही ठिकाणी कामे प्रत्यक्षात न करता बिले उचलण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.यात १. शिवणी ते बिरुबा मंदिर भाग (भाग-१ व भाग-२). २. आर.सी. रेंगे ते विरुबा मंदिर भाग (भाग-१ व भाग-२). ३. लक्ष्मीआई मंदिर ते सुपेकर यांचे शेत रस्ता शिंदे यांनी तक्रार दिली आहे की वरील रस्त्यांची कामे प्रत्यक्षात पूर्ण न करता निधीचा अपव्यय करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व कामांची समितीमार्फत सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवक व प्रशासनावर कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात अर्जाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, ग्रामपंचायत अधिकारी शिवणी तसेच ग्रामरोजगार सेवक यांनाही पाठविण्यात आली आहे. दरम्यान, या आरोपांमुळे शिवणी परिसरात खळबळ उडाली असून प्रशासनाकडून कोणती कारवाई होते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# संजय कोठारी यांच्या सामाजिक कामामुळे प्रशासनास मदत होते -पो.नि.दशरथ चौधरी

## निबंध व चित्र रेखाटन स्पर्धाचे बक्षीस वितरण संपन्न



जामखेड दि ४(प्रतिनिधी)- तालुका व परिसरात कोठेही अपघात घडल्या नंतर सर्वात अगोदर मदतीसाठी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी धावुन जातात, रुग्णांना तातडीने मदत होते. त्यांच्या सामाजिक कामामुळे प्रशासनास देखील मदत होते. माझ्या आतापर्यंतच्या काळात मला तरी आठवत नाही असे कोणी काम करत असेल असे प्रतिपादन जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी व्यक्त केले.

सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली, कोठारी प्रतिष्ठान जामखेड व समर्थ हॉस्पिटल जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने राजे छत्रपती शिवाजी महाराज व भगवान महावीर यांच्यावर निबंध व चित्र रेखाटन स्पर्धा जामखेड येथील ल ना होशिंग विद्यालयामध्ये घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचे बक्षिस वितरण समारंभ दि ३ मार्च रोजी कोठारी यांच्या वाढदिवसा दिवशी विविध मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुर्डूवाडी जि. सोलापूर येथील समाजसेवक डॉ. घेवरचंद धोका हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुरेश काशीद, नगराध्यक्षा सौ प्रांजलताई अमित चिंतामणी, उद्योजक प्रशांत बोकरिया, युवा उद्योजक गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर नाशिक भावेश बाफना, ल. ना. होशिंग विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब पारखे विद्यालयाचे पर्यवेक्षक अनिल देडे, जामखेडचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात नगरसेवक , प्रा. विकी घायतडक, मनोज कुलकर्णी अमित चिंतामणी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी चित्र रेखाटन स्पर्धा आणि निबंध स्पर्धेत ल.ना. होशिंग विद्यालयातील ७०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता पैकी चित्रकले स्पर्धेत पाचवी ते दहावी १९ विद्यार्थी विद्यार्थिनी यांना आणि निबंध स्पर्धा पाचवी ते नववी १५ विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले त्यांना ट्राफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे या कार्यक्रमास आकुर्डी निगडी प्राधिकरण जैन सावक संघाचे पूर्व अध्यक्ष समाजसेवक सुभाष ललवाणी, अध्यक्ष विजय गांधी, कोषाध्यक्ष नेनसुख मांडोत ,विश्वस्त दिलीप फिरोदिया, सदस्य सुरेश जैन नाशिक येथील मैत्री फाऊंडेशनचे तेजस धाडवाल ,ललीत धाडीवाल, संकेत कोठारी, प्रवीण होळकर, विनोद सुराणा , साई भोसले सर, शिवाजी (अण्णा)भोसले आदीसह मान्यवर मंडळी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश बोधले यांनी केले. सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले आभार तेजस कोठारी यांनी मांनले.



**बीड : स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनच्या वाढदिवसा निमित्त बुधभूषण पुस्तक देऊन शुभेच्छा देताना देवेंद्रसिंह ढाका,समीर काझी, शारुख पठाण,आनंद वीर**

## जय महेश मल्टि स्टेट वेहिकल सर्व्हिसेस को - ऑप सो. ली. व सद्गुरुकृपा ऑटोमोबाइल्स, ऑथोराइज्ड फ्रँचाइसी - श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी ली.

## जाहीर वाहन लिलाव

दि०६-०३-२०२६ रोजी थकीत कर्ज वसुली करिता जप्त केलेले वाहन लिलावा मध्ये विक्री साठी काढले आहे तरीही त्यांची यादी खालील प्रमाणे आहे सदरील वाहन धारकाला काहीही तक्रार असल्यास जाहिरात दिल्या पासून दोन दिवसाच्या आत ऑफिसला येऊन भेटणे व थकीत कर्ज भरून आपले जप्त वाहन सोडवून घेणे अन्यथा आपले वाहन लिलाव मध्ये विक्री झाल्यास होणाऱ्या नुकसान भरपाई पूर्णतः वाहन धारक जबाबदार राहिल व वाहन खरेदी साठी ग्राहक स्वतः दिलेल्या पत्त्यावर वाहनांची तपासणी करून खरेदी करू शकतो.

| Sr. No. | Vehicle No. | Customer Name | Make | Model |
|---|---|---|---|---|
| 1 | MH03DV5276 | SUNIL SAHEB MANE | TOUR M ERTIGA | 2022 |
| 2 | MH17AZ7435 | RAMESHWAR WAMANRAO SHINDE | RENAULT KWID RXL | 2016 |
| 3 | MH17AE2771 | KISHOR PANDURANG SALVE | SCORPIO M2DI | 2010 |
| 4 | MH05AX1317 | ROHINI ANANTRAO DHUMAL | SWIFT DZIRE VDI | 2011 |
| 5 | MH22U2285 | GANGADHAR ASHOK PAITHANE | CRUISER | 2012 |
| 6 | MH23AS7633 | VIJAY POMA RATHOD | JOHN DEERE 5050 | 2016 |
| 7 | MH21BF4302 | SIDDHESHWAR NARAYAN PHATE | JOHN DEERE 5305 | 2018 |
| 8 | MH13AX1313 | MAJAHAR KADAR SHAIKH | SCORPIO | 2011 |
| 9 | MH01EE5637 | SADDAM BAHADUR PATHAN | TOUR S | 2022 |
| 10 | MH22U5477 | SATYANARAYAN GOPIJI KALAL | BOLERO ZLX | 2014 |
| 11 | MH38W0683 | ZAHEERUDDIN TAJUDDIN SHAIKH | BAJAJ RE LPG | 2024 |
| 12 | MH24AB8553 | MAHADEV SHIVAJI KHAROSE | BOLERO PICKUP | 2016 |
| 13 | MH22U7266 | AMARJEET ABHAY KAPSE | KUV 100 | 2016 |


# वसंतदादा पाटील महाविद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन'उत्साहात साजरा

पाटोदा (प्रतिनिधी) : २८ फेब्रुवारी २०२६ रोजी येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.महान भारतीय शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण यांच्या कार्याचा गौरव म्हणून राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अभय क्षीरसागर होते.मंचावर मा. विकास पवळ, मा.विष्णू देव नागरगोजे, उपप्राचार्य प्रा नामदेव चांगण, पदव्युत्तर संचालक डॉ गणेश पाचकोरे, डॉ.सोनाजी गायकवाड उपस्थित होते.याप्रसंगी सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमास भामेश्वर विद्यालयातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना विशेष निमंत्रित करण्यात आले. डॉ सोनाजी गायकवाड यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व व सी.व्ही. रमण यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.भामेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रयोग शाळेत पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांची माहिती देण्यात आली.रसायनशास्त्र विभागामध्ये सविस्तर प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन करण्यात आले.

दै.पार्श्वभूमी,बीड Date-05/03/2026

## CHANGE IN NAME

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHENGE IN MY NAME

**OLD NAME - DAYAMA SHRIKRUSHNA RAMVILAS**

**CHENGE IN TO MY NEW NAME :- KRUSHNA RAMVILAS DAYMA**

ADDRESS - BANK COLONY MAJALGAON

## जाहिर प्रगटन

दि.०४/०३/२०२६

आमचे पक्षकार कचरुलाल दगडुलाल मानधने यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सुचनेवरून तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी विश्वास उत्तमराव महात्मे रा. भाटवडगांव ता. माजलगांव जि.बीड यांचेबरोबर त्यांचे प्रत्यक्ष मालकी व ताब्यातील ग्राम पंचायत मौजे काडीवडगांव ता. वडवणी जि.बीड हद्दीतील मालमत्ता नं. १७/२००० ज्याचे क्षेत्रफळ २५ X ४० असे एकुण क्षेत्रफळ १००० चौ. फुट असुन ज्याची चतुःसिमा पुर्वेस-रस्ता, पश्चिमेस-मोरे, निपटे व सावंत यांची जागा, दक्षिणेस-खरेदीदार यांची जागा, उत्तरेस-रोड. सदर वर्णनाच्या व चतुः सिमेच्या आतील मिळकत आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. ठरावानुसार सदर मालमत्ता ही निर्वीवाद, बिनबोजा व निरजोखमी असल्याची असल्याची हमी व खात्री उपरोक्त नमुद प्लॉट धारकांनी दिली आहे. तरी सदर मिळकीबाबत, व्यवहाराबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास जसे की, हक्कसंबंध, चोळी, बांगडी, गहाण, तारण, दानपत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, ईनाम, लेखी अथवा तोंडी खरेदीखत, बँक कर्ज, खाजगी कर्ज, शायकीय अथवा निमशासकीय कार्यालयात मिळकत हस्तांतरण कायद्यातील कोणत्याही तरतुदीप्रमाणे सदर मिळकतीबाबत व व्यवहाराबाबत हक्क अथवा आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसांचे आत नमुद पत्यावर योग्य त्या कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन व ग्राहय धरून आमचे पक्षकार सदर मिळकतीबाबत पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर येणारे आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
**ॲड. दिपक ल.देशमुख**
(जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगांव)
मो.नं.९८५००६१७७७

## जाहिर प्रगटन

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती अधिकार व सूचनेवरून सर्व जनतेस कळवण्यात येते की, **श्री.कृष्णा आशिराम यादव** रा.पिंपळटक्का ता. वडवणी जि.बीड (हे.मु.नाशिक) यांचे मालकी व ताब्यात असलेली शिवार पुसरा ता.वडवणी जि.बीड गट नं. २१३ मधील ४० आर जमीन, लोखंडी तारेचे कुंपण असलेली ४० आर जमीन म्हणजे पूर्व - पश्चिम १३२ फुट, व दक्षिण- उत्तर ३३० फूट अशी असुन याची चर्तुसिमा खालील प्रमाणे.

**पुर्व:** इम्रान शायक शेख व इतर यांची याच गटातील जमीन. **पश्चिम:** धैर्यशिल सुंदरराव सोळुंके यांची जमीन. **दक्षिण:** इम्रान शायक शेख व इतर यांची याच गटातील जमीन **उत्तर:** बीड-परळी रोड

वरील वर्णनाची व चर्तुसिमेच्या आतिल मिळकत आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे.ठरावानुसार सदर मालमत्ता हि निर्विवाद बीन बोजा व निरजोखीम हमी व खात्री उपरोक्त जमीनधारक यांनी दिले आहे, तरी सदर मिळकती बाबत व्यव्हाराबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत जसे की, हक्कसंबंध, चोळीबांगडी, गहाण, तारण, दानपत्र, नोटरी दस्त, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, इनाम, लेखी अथवा तोडी खरेदीखत, बँक कर्ज, खाजगी कर्ज, न्यायालयीन वाद, शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयात मिळकत, हस्तांतरण, कायद्यातील कोणत्याही तरतुदीप्रमाणे सदर मिळकतीबाबत व व्यवहाराबाबत हक्क अथवा आक्षेप आसल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासून १० दिवसाच्या आत नमुद पत्यावर सदर मिळकतीबाबतच्या सर्व कागदपत्रासह संपर्क साधावा, मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून व ग्राह्य धरुन सदर मिळकती बाबत पुढील खेरदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यांनतर येणारे आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दिनांक : ०५/०३/२०२६
ठिकाण : वडवणी

**जाहिर प्रगटन देणार : ॲड.एन.आर. लंगडे**
भारत सरकार नोटरी ऑफीस, दिवाणी व फौजदारी न्यायालय
वडवणीच्या शेजारी वडवणी ता.वडवणी जि. बीड.
मो.नं. ९८६०९७१८१८

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशील (१) अमोल सुभाषराव कोळपकर, वय : ३८ वर्षे, धंदाः व्यापार, रा. शाहुनगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड (२) अरविंद सुनिलराव खंडागळे, वय: ३९ वर्षे, धंदाः व्यापार, रा. माजलगाव, ता. माजलगाव जि. बीड. (३) शल्लवी वल्लभराव चौधरी, वय : ६१ वर्षे, धंदाः घरकाम, रा. समता कॉलनी, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड, यांनी विक्रेते (१) वर्षा सुनिल तिडके वय : ४० वर्षे, धंदाः वैद्यकीय व्यवसाय, रा. तिडके हॉस्पीटल बार्शी रोड, बीड ता. जि. बीड, (२) अश्विनी संदीप येवले रा. स्वराज्य नगर, बीड ता. जि. बीड यांच्या सामाईक मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील हद्दीतील शिवार मौजा धनगरवाडी (पायतळवाडी) ता. माजलगाव जि. बीड हद्दीतील सर्व्हे / गट नं.६८/९५३ मधील जमीन नामे सातलिंग, एकूण क्षेत्रफळ ०८ हे.१७ आर आकार ०६ रु.४२ पैसे हिस्सापूर्ण पैकी ०१ हे.१० आर जमीन जिची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेः

**पुर्वेस :** संदीपान जगताप यांची जमीन, **पश्चिमेस :** तोफिक अब्दुल सत्तार यांची जमीन, **दक्षिणेस :** माजलगाव गढी नॅशनल हायवे, **उत्तरेस :** अमरनाथ खुर्पे वगैरे व मच्छिंद्र बापुराव केंगार यांची जमीन

येणेप्रमाणे उपरोक्त वर्णनाची व चतुः सिमेच्या आतील मिळकत उपरोक्त मालकांकडुन आमचे अशीलांनी कायम खरेदी करण्याचा ठराव केला आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे अश्वासन व विश्वास उपरोक्त मालकांनी दिलेला आहे. या मिळकतीमध्ये कोणतेही व्यक्ती, संस्था अथवा बँक इ.चे काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध तसेच इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र, आममुख्त्यारपत्र इ. स्वरुपाचे हक्क संबंध असतील तर संबधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर मिळकतीचे कायम खरेदीखत आमचे अशील करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही व कसलाही आक्षेप चालणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन
दिनांक : ०४/०३/२०२५

मार्फत
**ॲड. सुर्यकांत एस. मुंडे,**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव
ऑफीस : डी. वाय. एस. पी. ऑफीस जवळ, सादोळा रोड, केसापुरी कॅम्प, माजलगाव जि. बीड
मो.नं.९४२१४८००७३

जाहिर प्रगटन देणार
**१) अमोल सुभाषराव कोळपकर**
रा. शाहुनगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड
**२) अरविंद सुनिलराव खंडागळे,**
रा. माजलगाव, ता. माजलगाव जि. बीड,
**३) शल्लवी वल्लभराव चौधरी,**
रा. समता कॉलनी, माजलगाव, जि. बीड
मो.नं.९४२०३३५५००/९७६७७११४४७

## जाहीर प्रगटन (वारस प्रमाणपत्रा बद्दल )

**श्री.आर.बी.पोळ, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, माजलगांव यांच्या न्यायालयात**

(मार्फत विधिज्ञ : श्री एस.सी.शर्मा)
कि. दि. अर्ज नंबर ११९/२०२६

**अर्जदार :** १)किरण भ्र.नंदकुमार मुंदडा, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. कल्याण नगर, वसमत रोड, परभणी जि. परभणी. २) ज्योती भ्र. राधेशाम नावंदर, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. फ्लॅट क्र.३, किरण घरकुळ, आदित्य नगर/मेहेर नगर च्या समोर, गजानन महाराज रोड, गारखेडा, ता.जि. छत्रपती संभाजी नगर. ३) किर्ती भ्र. शिवनारायण सोनी, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पांडुरंग निवास, बैंक कॉलनी, मंजरथ रोड, मु.पो.ता. माजलगांव जि.बीड

**विरूध्द - निरंक**

**प्रकरण :-** मुंबई नियमन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **प्रमीलाबाई भ्र. बद्रीनारायण दरक** हे/या दि.०१/१०/१९९९ रोजी शाहुनगर माजलगांव ता. माजलगांव जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आणि त्यांचे वरीलप्रमाणे वारस अर्जदार क्र.१ ते ३ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार / गैरअर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, त्यांना शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: २६/०२/२०२६ रोजी माझी स्वाक्षरी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख : ०६/०४/२०२६.**

आदेशावरून,
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव

क.लि.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्ह्यातील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे अशिल यांनी दिलेल्या अधिकारा वरून व दाखविलेल्या कागदपत्रां वरून, माहिती वरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, मिळकत मालक सौ. चित्रा मदनराव देशपांडे, रा. कडा, ता. आष्टी, जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील बीड तरफ खोड येथील नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नं.९९ मधील प्लॉट क्र. २८, ज्यास ग्रा.पं. कार्यालय, आनंदवाडी मालमत्ता क्र.७९३ असा मिळालेला आहे. ज्याची लांबी दक्षिणोत्तर ४५ फुट व पुर्व-पश्चिम ४० फूट आहे, ज्याचे एकुण क्षेत्रफळ १८०० चौरस फुट म्हणजेच १६७.२८ चौ. मीटर आहे.

ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
**पुर्वेस :** २० फुट रुंदीचा रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट क्र.२९
**दक्षिणेस :** २० फुट रुंदीचा रस्ता, **उत्तरेस :** प्लॉट क्र.२३

उपरोक्त वर्णन केलेली मिळकतीचा आमच्या अशिलाने वर नमूद मिळकत यांच्या सोबत खरेदीचा व्यवहार केलेला आहे.

तरी सदर उपरोक्त मिळकतीचे मालक यांनी वरील वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही निर्विवाद असून, यापूर्वी बँक कर्ज, खाजगी कर्ज, ईसारपावती, कोणास दान, गहाण, तारण, विक्री, भाडेपत्र, ईसारपावती, मुखत्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कुठल्याही मार्गान लेखी किंवा तोंडी खरेदी बाबत, वारसाने येणारे हक्क, बक्षीस, कूळ, इनाम, अथवा इतर प्रकारे हस्तांतरण व्यवहार झालेला नसल्याचे हमी दिली असून, सदर मिळकतीत कोणाचे काही हितसंबंध गुंतलेले असतील किंवा कोणाचाही काही आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसाच्या आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासह संपर्क साधावा.

मुदतीत कोणाचा आक्षेप आला नाही तर, कोणाचाही आक्षेप नाही, असे ग्राह्य धरून आमचे अशिल / जाहीर प्रगटन देणार सदरील प्लॉट मिळकतीबाबत मिळकत मालक यांच्याशी उपरोक्त मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येते.
बीड
दिनांक: ०४/०३/२०२६

मार्फत
**ॲड.आशिष दिलीपकुमार ललवाणी,**
मोबा.८६००२४५४८४
रा. नवकार कॉम्प्लेक्स, नवी भाजी मंडई, बीड, ता.जि. बीड.

16568/13459

# पार्श्वभूमी

दि.०५ मार्च २०२६ गुरुवार



## बीजनिमित्त भीमराव महाराज यादव यांचे कीर्तन

बीड दि.४ (प्रतिनिधी):–जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीज सोहळ्यानिमित्त गुरुवार ५ मार्च २०२६ ह.भ.प. भागवताचार्य भीमराव महाराज यादव यांचे सकाळी १० ते १२ या वेळात हरिकीर्तन होणार आहे. भाविकांनी इच्छापूर्ती दक्षिणमुखी हनुमान मंदिर, जुनी भाजी मंडी, बीड येथे होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन ह.भ.प. संतचरणरज मनोज महाराज बोटे यांनी केले आहे.



बीड : येथील प्रसिद्ध सीए संतोष आमटे यांचा वाढदिवस कार्यालयात साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## जिल्ह्यातील चुकीचे फार्मर आयडी दुरुस्तीसाठी पर्याय उपलब्ध करा

बीड दि.४(प्रतिनिधी):- शासनाकडून शेतकऱ्यांना विविध योजनेचा पारदर्शक लाभ देण्यासाठी फार्मर आयडी ही संकल्पन राज्यभर राबवून, बंधनकारक करण्यात आली आहे. परंतु बीड जिल्ह्यात शासनाकडून पथदर्शी प्रकल्पा अंतर्गत काढलेले फार्मर आयडीमध्ये जमिनीचे वाढीव क्षेत्र जोडल्यामुळे शेतकरी पोखरासह विविध योजनेने लाभापासून पासून वंचित राहत आहेत.जिल्हामध्ये फार्मर आयडी योजना राबवताना शेतकऱ्यांची जमीन धारणा तलाठी यांनी केली होती. जमीन धारणा करताना प्रत्येक गटामध्ये १ हेक्टर ९९ आर एवढे अवास्तव जमीन दाखवण्यात आलेली आहे. ८ अ पेक्षा जास्त जमीन जोडल्यामुळे लाभ घेताना अडचणी निर्माण होत आहे. शासन स्तरावरून तलाठी मार्फत ( फार्मर आयडीला ) दुरुस्ती देण्यात आली. परंतु क्षेत्र कमी करण्यासाठी अद्याप पर्यंत कुठलाही पर्याय उपलब्ध नाही.

पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संथ कारभारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



बीड दि ४ (प्रतिनिधी)– शहरातील सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका चौक या मुख्य रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कामाची गती अत्यंत संथ असल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

बार्शी रोडवर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खोदकाम करण्यात आले असून ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. मात्र या ठिकाणी कोणतेही सूचना फलक, वळण दर्शविणारे फलक किंवा पर्यायी मार्गाची माहिती देणारे दिशादर्शक फलक नसल्याने अपघाताचा ढोक धोका होण्याची शक्यता आहे. दिशादर्शक फलक नसल्याने त्यामुळे वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे.खोदकाम झालेल्या भागावर

पान २ वर

## पाटोदा येथे पोलीस पाटील भरती मुलाखत प्रक्रिया सुरळीत

### चार दिवसात ३६९ मुलाखती

पाटोदा दि.४(महेश बेदरे):-पोलीस पाटील भरती प्रक्रियेचा निर्णायक टप्पा सध्या पाटोदा शहरातील तहसील कार्यालयाच्या सभागृहात अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक वातावरणात सुरू आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्या बारकाईने आखलेल्या नियोजनातून तसेच तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या देखरेखीखाली ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.एकूण ८१९ पात्र उमेदवारांपैकी चार दिवसांत, म्हणजेच ४ मार्चअखेर, ३६९ उमेदवारांच्या तोंडी मुलाखती यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत. बुधवारी एकाच दिवशी तब्बल १५० उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्रत्येक उमेदवाराला पाच मिनिटांचा वेळ देत गुणवत्ता, आत्मविश्वास आणि गावपातळीवरील नेतृत्वक्षमता यांची कसून चाचणी घेतली जात आहे.मुलाखतीपूर्वी कागदपत्र पडताळणीसाठी स्वतंत्र तीन टेबलची व्यवस्था करण्यात आली असून नोडल ऑफिसर म्हणून अभयकुमार जोशी तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे शेख बाबर हे कामकाज पाहत आहेत. तहसील कार्यालयातील श्रीमती वैशाली जाधव, पोले,



नाईक, घुमरे यांच्यासह विविध अधिकारी-कर्मचारी काटेकोरपणे जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

मुलाखत समितीत उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, समाज कल्याण विभागाच्या प्रतिनिधी जावळे मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून एपीआय संभाजी तागड तसेच आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील यांचा समावेश आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया सर्वसमावेशक आणि संतुलित स्वरूपात पार पडत आहे.या प्रक्रियेत उच्चशिक्षित पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार मोठ्या संख्येने

पान २ वर

## नगराध्यक्षा यांच्या पुढाकारातून पाटोद्यात महिलांसाठी रंगोत्सव संपन्न



पाटोदा दि.४(प्रतिनिधी):- पाटोदा शहरात धुलीवंदनानिमित्त महिलांसाठी विशेष रंगोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नगराध्यक्षा दिपाली जाधव यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शहरातील संगमेश्वर परिसरात नैसर्गिक रंगांचा वापर करून हा कार्यक्रम संपन्न झाला. महानंदाच्या संचालिका प्राजक्ताताई सुरेश धस यांच्या संकल्पनेतून व सूचनेनुसार मागील तीन वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. महिलांनी पारंपरिक पद्धतीने, सुरक्षित व पर्यावरणपूरक रंगोत्सव साजरा करत एकमेकांना रंग लावत आनंद व्यक्त केला. कार्यक्रमास महंत राधाताई महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पान २ वर

## पिंपळनेर भागात कडवळ, मका हिरव्या चाऱ्याला वाढली मागणी

पिंपळनेर दि ४ (प्रतिनिधी)-उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने तसेच बहुतांश साखर कारखान्यांच्या गाळप हंगाम संपल्याने जनावरांसाठी मकासारख्या हिरव्या चाऱ्याची मागणी दूध उत्पादकांकडून वाढू लागली आहे कारखाने सुरू असताना दूध उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात जनावरांना हिरवाचारा म्हणून उसाच्या वाढ्याचा वापर करीत होते. त्यामुळे आतापर्यंत मका, कडवळ यासारख्या हिरव्या चाऱ्याला फारशी मागणी नव्हती. मात्र, गाळप हंगाम बंद झाल्याने बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील शेतकरी मका, कडवळ या चाऱ्याकडे वळल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, शेतकऱ्यांना यावर्षीचा गाळप हंगाम लवकर संपण्याचा अंदाज होता. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी नियोजन करून मका आणि कडवळ या चारा पिके घेतली आहेत. ही पिके मार्च, एप्रिल महिन्यात उपयोगात येतील. काही भागात आतापासूनच या पिकांना मोठी मागणी सुरू झाली आहे.मका या हिरव्या चाऱ्याचा दूध उत्पादक मुरघास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर करतात. हा मुरघास साठवून ठेवता येतो. तो उन्हाळ्यात चार-पाच महिन्यांपर्यंत वापरता येतो. सध्या हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी असल्याने दोन ते अडीच हजार रुपये भावाने मका या पिकांची विक्री होत आहे.

## आ.सुरेश धस यांची अधिवेशनात व्यस्त असतानाही कनेक्टिव्हिटी कायम

### कामानिमित्त आलेल्या नागरिकांशी ऑनलाईन संवाद



पाटोदा :(महेश बेदरे ) :- राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे सुरू असताना देखील आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश आण्णा धस यांनी आपल्या मतदारसंघाशी असलेली 'कनेक्टिव्हिटी' अखंड ठेवत जनतेशी थेट संवाद साधला. अधिवेशना च्या व्यस्त वेळापत्रकातही त्यांनी आष्टी येथील कार्यालयात ऑनलाईन स्क्रीनची व्यवस्था करून ग्रामस्थां च्या अडचणी जाणून घेत तातडीने कार्यवाही केली.

बुधवारी सकाळी पाटोदा तालुक्यातील सोनेगाव येथील सुनील चौरे, प्रताप चौरे रमेश चौरे यांच्यासह काही कार्यकर्ते महत्त्वाच्या कामानिमित्त आष्टी येथील कार्यालयात आले होते. आ.धस हे अधिवेशना साठी मुंबईत असल्याने कार्यालयात थेट स्क्रीन द्वारे संवादाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या माध्यमातून आ.धस यांनी ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली. ग्रामस्थांनी मांडलेल्या प्रश्नांवर आ.धस यांनी तत्काळ संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या. काही कामांबाबत त्वरित हालचाल सुरू करण्याचे निर्देश देत त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क केले. त्यामुळे उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.आमदार धस हे नियमितपणे मतदारसंघातील नागरिकांना वेळ देऊन त्यांच्या समस्या ऐकून घेतात. अधिवेशनकाळात मुंबईत असतानाही ऑनलाईन माध्यमातून जनतेशी संपर्क कायम ठेवत त्यांनी 'कनेक्टिव्हिटी'चे उदाहरण घालून दिले आहे. कार्यालयीन कामकाज पाहणारे सहाय्यक दत्ता हुले व दीपक उंबरकर हे

पान २ वर


**Bharat Petroleum Corporation Limited**
(A Government of India Enterprise)

**NOTICE**

**Bharat Petroleum Corporation Ltd. (BPCL)** hereby Inform that the Re-Draw for LPG Distributor for Location (As per List Below) will be held on (as per Dates indicated) at the venue **DPDC Hall, Office of District Collector, Railway Station Road, Opposite BSNL Bhavan, Vazirabad, Nanded – 431 601** at (Times and Date as stated below)

Applicants who have qualified for the Re-Draw are requested to be present in person with a photo identity card issued by any Government Department, at the specified date, time and venue.

| Sr.No. | Location | Date of Re-Draw | Time of Re-Draw |
|---|---|---|---|
| 1 | Wida, Beed | 05.03.2026 | 11.30 am |

**भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उद्यम)

**सूचना**

**भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल)** याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील निर्देशित स्थळासाठी एलपीजी वितरकांच्या निवडीसाठी री-ड्रॉ (पुनः सोडत),ठिकाण: **डी.पी.डी.सी हॉल**,जिल्हाधिकारी कार्यालय,रेल्वे स्टेशन रोड, बी.एस.एन.एल कार्यालय समोर,वजिराबाद, जिल्हा -नांदेड - ४३१ ६०१ येथे होणार आहे.

(खाली दर्शविलेले तारीख व वेळ यानुसार)

या पुनःसोडतीसाठी लायक / पात्र / अर्हता प्राप्त अर्जदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी निर्देशित तारीख, वेळ आणि ठिकाण यानुसार सरकारद्वारा दिल्या गेलेल्या ओळखपत्रासहित उपस्थित राहण्याची कृपा करावी.

| अ.क्र | स्थळ | ड्रॉ (सोडत) तारीख | ड्रॉ (सोडत) वेळ |
|---|---|---|---|
| १ | विडा, बीड | ०५. ०३. २०२६ | स. ११:३० वा. |


## अंबाजोगाई येथील जिल्हा कारागृहाच्या संरक्षक भिंतीसाठी ४ कोटींचा निधी मंजूर

### आ.नमिताताई मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश



अंबाजोगाई दि ४ (प्रतिनिधी)- येथील प्रस्तावित जिल्हा कारागृहाच्या ३० एकर शासकीय जमिनीला सुरक्षा प्रदान करण्यासाठी ४ कोटी ५ लक्ष ७९ हजार २५८ रुपयांच्या निधीला बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. आ. नमिता मुंदडा यांनी या कारागृहासाठी आणि जमिनीवर होणारी संभाव्य अतिक्रमणे रोखण्यासाठी शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत मंजूर झालेल्या या निधीतून सर्वे क्रमांक १७मधील ३० एकर परिसरात मोठी संरक्षक भिंत उभारली जाणार आहे. या प्रकल्पात भिंतीच्या बांधकामासह सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचाही समावेश करण्यात आला असून जिल्हा कारागृह अधीक्षकांमार्फत या कामाची अंमलबजावणी होईल. बीड जिल्हा कारागृहावरील ताण कमी करण्यासाठी

पान २ वर

## विभागीय लोकशाही दिनाचे मंगळवारी आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.२ (विमाका): विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे मार्च महिन्यात दुसऱ्या मंगळवार १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत.अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात.

पान २ वर

## पेट्रोल- डिजेलचा तुटवडा नाही

## अफवावर विश्वास न ठेवण्याचे शासनाकडून आवाहन




अंबाजोगाई दि ४ (प्रतिनिधी)- बीड जिह्यात आखाती देशातील युद्धा मुळे इंधन टंचाई झाली असल्याने जिल्यातील पेट्रोल पम्पावर गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. जिल्ह्यात पेट्रोल डिजलचा पुरेसा साठा असून पुरवठा सुरळीत चालू असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दि ४ मार्च रोजी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे. आखाती देशातील ताणतणावामुळे वाहनधारकात भीतीचे वातावरण झाले आहे. परंतु आफवावर विस्वास ठेवू नये असे अहवान करून जिल्यातील पम्पधारकांना पेट्रोल,डिजल वितरणा संदर्भात योग्य त्या सूचना देण्यात आल्याचे हे समजते.


**नगरपंचायत कार्यालय,**
**वडवणी जि.बीड**

दुरध्वनी क्र. १८००-२३३७-५९६ Email- nagarpanchyatwadwanigmail.com

जा.क्र.२०२६/न.पं./स्व/बां वि/कावि दि. ०२/०२/२०२६

**ई-निविदा क्रं.(०५)**
**न.पं./२०२५-२६**

**नगर पंचायत वडवणी यांच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० या योजने अंतर्गत ई निविदा क्र.०५ असा असुन सदरील कामासाठी कंत्राटदार/संस्था यांच्याकडुन** B-1 **नमुन्यात ई निवीदा मागविण्यात येत आहेत. कंत्राटदार/संस्था यांनी दि. १०/०३/२०२६ वेळ १७.०० वाजेपर्यंत ई-निविदा भराव्यात सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या** http://mahatenders.gov.in **या संकेत स्थळावर दि०२/०३/२०२६ रोजी ११.०० वाजेपासुन दि. १०/०३/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत पाहता व डाऊनलोड करता येईल.**

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत वडवणी**



SUWARNAM JEWELS PVT LTD

**SUWARNAM JEWELS PVT. LTD., BEED**
विश्वास • परंपरा • उत्कृष्टता

**स्टाफ भरती सुरू आहे**

**आमच्या वाढत्या ज्वेलरी शोरूमसाठी उत्साही व प्रामाणिक उमेदवारांची आवश्यकता.**

**उपलब्ध पदे:**
- सेल्स एक्झिक्युटिव्ह (Male/Female)
- कॅशियर
- सुपरवायजर
- हाऊस किपिंग स्टाफ
- सिक्युरिटी गार्ड

**पात्रता :**
- किमान 12वी उत्तीर्ण (ग्रॅज्युएट प्राधान्य)
- सेल्स अनुभव असल्यास प्राधान्य
- चांगले संवाद कौशल्य
- प्रामाणिक व ग्राहकाभिमुख स्वभाव

**सुविधा:**
- आकर्षक पगार + इन्सेंटिव्ह
- PF व ESI सुविधा उपलब्ध
- सुरक्षित व प्रतिष्ठित कामाचे वातावरण
- करिअर वाढीची उत्तम संधी



**06/03/2026** पर्यंत resume/CV प्रत्यक्ष, email किंवा whatsapp वर पाठवावे
**WhatsApp : 9503894014**
(Only WhatsApp, No call)
Email - suwarnamjewelspvtltd@gmail.com

**कामाचे ठिकाण :**
**सुवर्णम ज्वेल्स प्रा. लि.**
अण्णाभाऊ साठे चौक, जालना रोड, बीड.

**आजच अर्ज करा आणि सुवर्ण भविष्य घडवा!**